महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL


प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १६ अंकः ४ पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार २२ एप्रिल २०२५ ते सोमवार २८ एप्रिल २०२५ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## प्रकल्पांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यास प्राधान्य द्या



**मुंबई (विशाल कारंडे): मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वॉररुम बैठकीमध्ये मागील बैठकांमधील १८ प्रकल्प आणि नवीन १५ महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेतला. राज्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून हे प्रकल्प महत्त्वाचे असून, दिलेल्या वेळापत्रकानुसार या प्रकल्पांचे काम व्हावे, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. तर दूरदृष्यप्रणालीद्वारे विविध विभागांचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. वॉररुम बैठकीमध्ये मुंबईसह, विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील विविध महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला.**

यामध्ये मुंबईतील मेट्रो लाईन २ बी (डीएन नगर ते मंडाळे), मेट्रो लाईन ४ (वडाळा ते कासारवडवली), मेट्रो लाईन ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण), मुंबई मेट्रो ६ (स्वामी समर्थनगर-विक्रोळी), मुंबई मेट्रो ७ ए (अंधेरी-छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २), मुंबई मेट्रो लाईन ९ (दहिसर (पू) ते मिरा भाईंदर), ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह टनेल प्रकल्प, बोरिवली ते ठाणे जोड बोगदा प्रकल्प, उत्तन-विरार सी लिंक, शिवडी-वरळी ईलेव्हेटेड कॉरिडॉर, पुणे मेट्रो, दहिसर ते भाईंदर लिंक रोड, गोरेगाव मागाठाणे डीपी रोड, गोरेगाव–मुलुंड लिंक रोड आणि उत्तर सागरी किनारा मार्ग या प्रकल्पांचे सादरीकरण झाले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, विकासात्मक प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण होण्यासाठी त्यांचे सूक्ष्म नियोजन करावे. संबंधित यंत्रणांनी त्यांच्या स्तरावर आवश्यकतेनुसार बैठका घेऊन कामातील अडचणी दूर कराव्यात, जेणेकरून विकास प्रकल्पांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करता येतील. विकास प्रकल्पांची कामे गतीने करण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया गतीने राबवून संबंधित यंत्रणेला विकास कामासाठी जमीन उपलब्ध करून द्यावी. ज्या ठिकाणी वन व पर्यावरण विषयक परवानगी आवश्यक आहे, ती घेण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार झोनल मास्टर प्लॅन तयार करावा. धारावी सारख्या प्रकल्पाचे अचूक सर्वे करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. विदर्भ व मराठवाड्याला जोडणाऱ्या वर्धा-नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी जमीन संपादनाचा विषय मार्गी लावावा. वर्धा-गडचिरोली रेल्वे लाईनमध्ये खासगी जमीन खरेदी प्रक्रिया सात दिवसांत करावी. सागरी वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरणाऱ्या वाढवण बंदर प्रकल्पामध्ये वन जमिनी संदर्भात मार्ग काढून याबाबत निर्णय घेण्यात यावा. वाढवण बंदर हा राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रकल्प असून, यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे.

(शेष पृष्ठ ६ वर)

## संक्षिप्त

### ठाकरे बंधु एकत्र येणार का? ठाकरे गटाची पुन्हा हातमिळवणी; मनसेतून विरोधाचा सूर

■ मुंबई : गणेश बागडे

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एका मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या शक्यतांच्या चर्चांना उधाण आले आहे. अनेक वर्षांपासून केवळ चर्चेपुरती मर्यादित असलेली ही शक्यता यावेळी मात्र प्रत्यक्षात उतरण्याची चिन्हं दिसत आहेत. आगामी महापालिका निवडणुकांसाठी राज ठाकरे यांच्या मनसेने



आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने (ठाकरे गट) पुन्हा हातमिळवणी केल्यास राज्याच्या राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारूण पराभवानंतर आता महापालिका निवडणुकांसाठी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसह महायुती आणि महाविकास आघाडीनेही जोरदार तयारी सुरू केली आहे. विशेष म्हणजे राज आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येण्यासाठी काही ठोस पावलंही उचलल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे यावेळी तरी हे दोघे बंधु एकत्र येणार का, मनसे-ठाकरे गटाची युती होणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. पण या युतीसाठी मात्र मनसे आणि ठाकरे गटातील नेत्यांकडूनच विरोधाचा सुरू उमटताना दिसत आहे.

### आता ओला-उबर कॅबचे दर सरकारने निश्चित केलेले, प्रवाशांचे जास्त पैसे खर्च होणार

**पुणे-** पिंपरी-चिंचवड आणि बारामती शहरांमध्ये ओला, उबर आणि रॅपिडो सारख्या ॲप-आधारित कॅब सेवांसाठी राज्य सरकारने निश्चित केलेले दर आता लागू होणार आहेत. हे दर ऑटो रिक्षा प्रमाणेच राहतील आणि १ मे २०२५ पासून अंमलबजावणी होणार आहे. सरकारमान्य दर लागू केल्याने आता ग्राहकांना कॅब सेवेसाठी जास्त पैसे




खर्च करावे लागणार आहेत. इंडियन गिग वर्कर्स फ्रंटचे अध्यक्ष केशव क्षीरसागर यांनी सांगितले की, कॅब चालकांच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाला. नवीन दरानुसार, पहिल्या १.५ किलोमीटरसाठी ३७ रुपये आकारले जातील आणि त्यानंतर प्रत्येक किलोमीटरसाठी २५ रुपये भाडे लागेल. उदाहरणार्थ, १० किलोमीटर प्रवासासाठी ग्राहकांना आता किमान २४९.५० रुपये मोजावे लागतील, जे सध्याच्या सरासरी नॉन-सर्ज फेरपेक्षा अधिक आहेत.

## कुंभमेळ्याची तयारी अन महिलांना पाण्यासाठी विहिरीत उतरण्याची वेळ

■ नागपूर: सम्यक कासारे

राज्य सरकार नाशिक येथे कुंभमेळ्याची जोरदार तयारी आहेत. त्यासाठी ५ हजार कोटी खर्च केला जाणार आहे. पण, याच नाशिक जिल्ह्यात पिण्यासाठी पाणी मिळावे म्हणून महिलांना जीव धोक्यात घालून विहिरीत उतरण्याची वेळ येत आहे. महिला जीवाचा



धोका पत्करून विहिरीत उतरत असल्याची चित्रफित प्रसारित झाली आहे, याकडे काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी लक्ष वेधले आहे. ते आज माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

ते म्हणाले, घोटभर पाण्यासाठी माता-भगिनींना संघर्ष करावा लागतो. हे महाष्ट्रासाठी अत्यंत लाजीरवाणे आहे. पाण्यासाठी जर जीव मुठीत घेऊन विहिरीत उतरावे लागते असेल तर कसला विकास असा प्रश्न त्यांनी केला आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी सरकार पाच हजारो कोटी रुपये खर्च करायला तयार आहे. उत्सवांवर, कार्यक्रमांवर उधळपट्टी करायला पैसा आहे, पण लोकांना प्यायला पाणी देण्यासाठी नाही? हा कसला प्राधान्यक्रम, हा कसला विकास आहे. नाशिक जिल्ह्यात चांदवड तालुक्यात पाण्याची भीषण टंचाई असून महिलांना पाण्यासाठी विहिरीत उतरावे लागत आहे. त्याची चित्रफित व्हायरलं झाली आणि त्याचा आधार घेत वडेट्टीवार यांनी सरकारला विकासाच्या संकल्पबाबत प्रश्न विचारला. दरम्यानस नाशिक जिल्ह्यातील आदिवासी पाड्यावरील महिला पाण्याच्या शोधात भटकंती करत असतात. आदिवासी भागात भीषण पाणी टंचाई जाणवू लागली आहे.

(शेष पृष्ठ ६ वर)

## महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा उल्लेख करत राहुल गांधींची अमेरिकेतून टीका

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अमेरिकेतल्या बोस्टन या ठिकाणी असलेल्या ब्राऊन विद्यापीठाचा दौरा केला. यावेळी त्यांनी या विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राहुल गांधींनी यावेळी आपल्या भाषणात महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा मुद्दा उपस्थित केला. राहुल गांधी दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर आहेत. अमेरिकेतल्या बोस्टन या ठिकाणी त्यांचं जोरदार स्वागत करण्यात आलं. दरम्यान त्यांनी विद्यापीठात बोलताना महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवर भाष्य केलं. 'महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत तरुणांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केल्याचं दिसून आलं. हे एक वास्तव आहे. मात्र निवडणूक आयोगाने आम्हाला संध्याकाळी ५.३० पर्यंत झालेल्या मतदानाचीच आकडेवारी दिली. त्यानंतर संध्याकाळी ५.३० ते ७.३० या कालावधीत जेव्हा मतदानाची वेळ संपलेली असते त्या कालावधीत ६५ लाख मतदारांनी मतदान केलं. असं घडणं केवळ अशक्य आहे. कारण एका मतदाराला मतदान करायला साधारण तीन



मिनिटं लागतात. जर ही वेळ लक्षातघेतली तर रात्री २ वाजेपर्यंत मतदार रांगेत उभे होते आणि त्यानंतर पहाटेपर्यंत मतदान प्रक्रिया चालली असा होतो. पण असं कुठेही घडल्याचं पाहण्यास मिळालं नाही.' असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. राहुल गांधी म्हणाले की 'आम्ही निवडणूक आयोगाला विचारलं होतं की मतदान प्रक्रियेची व्हिडीओग्राफी केली जाणार आहे का?

(शेष पृष्ठ ६ वर)

## माजी पोलीस महासंचालक ओम प्रकाश यांची हत्या; हत्येनंतर पत्नीचा मैत्रिणीला व्हिडिओ कॉल

■ कर्नाटक : वृत्तसंस्था

कर्नाटकचे माजी पोलीस महासंचालक ओम प्रकाश (६८) यांची राहत्या घरी हत्या झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात आता धक्कादायक माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ओम प्रकाश यांची पत्नी पल्लवी यांनी पोलीस नियंत्रण कक्ष ११२ वर फोन करून हत्या केल्याचे कबूल केले. दरम्यान या प्रकरणात ओम प्रकाश यांचा मुलगा कार्तिकेश याने काही मोठे खुलासे केले आहेत. रविवारी संध्याकाळी बेंगळुरूमधील एचएसआर लेआउट येथील त्यांच्या राहत्या घरी ओम प्रकाश यांचा चाकूने वार केलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला होता. दरम्यान पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या



माहितीनुसार, ओम प्रकाश यांची पत्नी पल्लवीने फोनवर हत्या केल्याची कबुली दिली. यानंतर घटनेवेळी घरात उपस्थित असलेल्या पल्लवी आणि त्यांच्या मुलीला पोलिसांनी ताब्यात घेतले, पण त्यांचा मुलगा कार्तिकेश हा घटना घडली तेव्हा घरात नव्हता. एफआयआरनुसार, कार्तिकेश जेव्हा घरी आला तेव्हा त्याला त्याचे वडील रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर पडलेल्या अवस्थेत आढळून आले होते. एचएसआर लेआऊट पोलिस स्टेशनमध्ये नोंदवण्यात आलेल्या तक्रारीनुसार, कार्तिकेशने हत्येसाठी त्याची आई किंवा बहिणीवर थेट आरोप करणे टाळले, तसेच तो घरी परतल्यानंतर त्याच्या वडीलांचा मृतदेह आढळून आला असेही त्याने सांगितले.

(शेष पृष्ठ ६ वर)

## राज्यात उष्णतेचा कहर

## मुंबईतही तापमान वाढण्याचा इशारा

■ मुंबई : मेहुल गायकवाड

राज्यात उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढत चालला आहे. अनेक भागांत तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. मुंबईत तुलनेने तापमान जरी कमी असले तरी सोमवारपासून तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे पुढचे दोन ते तीन दिवस मुंबईकरांना उकाड्याबरोबरच उन्हाचा तडाखाही सहन करावा लागणार आहे. मुंबईत सध्या कमाल तापमान ३२ ते ३३ अंशादरम्यान आहे. मात्र वाढती आर्द्रता आणि दमट हवामान यांमुळे उष्मा



अधिक जाणवत आहे. दिवसभराचे तापमान कमी असल्यामुळे मागील काही दिवसांपासून उन्हाच्या तडाख्यापासून मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे. मात्र, आता पुन्हा उन्हाचा चटका सहन करावा लागणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सोमवारपासून साधारण बुधवारपर्यंत मुंबईच्या तापमानाचा पारा चढा राहणार आहे. त्यामुळे उकाडा आणि उन्हाचा ताप नागरिकांना सहन करावा लागणार आहे. या दिवसांत तापमानात २ ते ३ अंशांनी वाढ होण्याची शक्यता आहे.

(शेष पृष्ठ ६ वर)

## इतर भाषांचा द्वेष म्हणजे मातृभाषेवर प्रेम नाही -राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

■ मुंबई : गणेश बागडे

'स्वतःच्या भाषेवर प्रेम करताना दुसऱ्या भाषांचा द्वेष करून आपण पुढे जाऊ शकत नाही. इतर भाषांचा द्वेष करणे म्हणजे स्वतःच्या मातृभाषेवर प्रेम करणे नाही. आपल्याला मातृभाषा प्रचंड आवडते, यात काही वावगे नाही. परंतु तुम्हाला विविध भाषा बोलता येणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपण अधिक प्रगत बनतो', असे स्पष्ट मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या स्थापना दिन सोहळ्यात व्यक्त केले. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या दुसऱ्या स्थापना दिन सोहळ्याचे शनिवार,




१९ एप्रिल रोजी मुंबईतील महानगरपालिका मार्ग येथील रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एल्फिस्टन टेक्निकल हायस्कूलमधील सेंट्रल हॉलमध्ये आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन होते. तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष टी.जी. सीताराम, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी नाविन्यपूर्ण अध्यापन व कामासाठी सर्वोत्कृष्ट शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना पाठबळ देऊन 'स्टार्टअप'मध्ये रुपांतर करण्यासाठी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठातर्फे आयोजित 'आयडिएशन' या स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांनी प्रास्ताविक केले. 'हिंदी भाषा आवश्यक आहे.

(शेष पृष्ठ ६ वर)

## बिहार निवडणुकीसाठी भाजपाचा गेम प्लान 'मिथिलांचल'

■ बिहार : वृत्तसंस्था

बिहार विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाने त्यांची रणनीती आखायला सुरूवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २४ एप्रिल रोजी मधुबनी इथे एका सभेला संबोधित करण्याची शक्यता आहे. सत्ताधारी भाजपा-जेडीयू युती त्यांच्या बालेकिल्ल्यात पाठिंबा मजबूत करण्यासाठी प्रयत्न करत आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये, बिहारच्या दरभंगा इथे एम्स कॅम्पसची पायाभरणी करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इथली एक म्हण ऐकवली होती. 'पुग पुग पोखरी, मच्छ माखानष्ठ मधुर बोल, मुस्की मुख पान', असे म्हणत पंतप्रधानांनी मिथिलांचलमधील तलाव, मासे, मखाना आणि इथली बोली याचे वर्णन केले. त्याच दरम्यान केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी मधुबनीला भेट दिली होती. तिथे झालेल्या एका क्रेडिट आउटरीच कार्यक्रमादरम्यान ५० हजार २९४ लाभार्थ्यांना १ हजार १२१ कोटी रूपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. १ फेब्रुवारीला सादर केलेल्या अर्थसंकल्पात सीतारामण यांनी दलित कलाकार दुलारी देवी यांनी भेट दिलेली मधुबनी कलाकृतीची साडी परिधान केली होती. अर्थसंकल्पात त्यांनी मिथिलांचलसाठी महत्त्वपूर्ण घोषणा केली. मिथिलांचल इथे मोठ्या प्रमाणात पिकवल्या जाणाऱ्या मखानाच्या उत्पादन आणि विपणनाला चालना देण्यासाठी मखाना बोर्डाची स्थापना करण्याची घोषणा केली.



९ मार्चला अहमदाबाद इथे 'शाश्वत मिथिला महोत्सव २०२५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला संबोधित करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुजरातच्या विकासात योगदान दिल्याबद्दल मिथिलांचल आणि बिहारच्या लोकांचे कौतुक केले होते. 'या प्रदेशाला लोकशाही आणि तत्त्वज्ञानाच्या सशक्तीकरणाचा इतिहास आहे', असं शाह यांनी त्यावेळी म्हटले होते. त्यानंतर आता २४ एप्रिलला पंतप्रधान नरेंद्र मोदी मधुबनी जिल्ह्यातील झांझरपूरला एका सार्वजनिक सभेत उपस्थित राहणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. वर्षाअखेरीस होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा मिथिलांचलला आपल्या प्रचाराचा केंद्रबिंदु बनवणार असल्याचे यावरून स्पष्ट होते अशी चर्चा सध्या आहे. मिथिलांचल प्रदेशात सीतामढी, मधुबनी, सहरसा, दरभंगा, मधेपुरा, कटिहार, सुपौल, अररिया, बेगुसराय, समस्तीपूर, पूर्णिया आणि मुझफ्फरपूर यांसह अनेक जिल्हे आहेत. बिहारच्या २४३ विधानसभा जागांपैकी १००हून अधिक जागा इथे आहेत. यापैकी बहुतेक जागा सध्या भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएकडे आहेत. या प्रदेशात बोलली जाणारी मैथिली ही राज्याच्या १३ कोटी लोकसंख्येपैकी सुमारे एक तृतीयांश लोकांची भाषा आहे.




# मराठीच्या गळयात हिंदीचे लोढणे

महाराष्ट्रातील शाळांमध्ये हिंदी भाषा इयत्ता पहिलीपासून शिकवण्याची गरज नाही. इयत्ता पाचवीपासून हिंदी शिकवली जाते, त्याबद्दल आजपर्यंत वाद झालेला नाही, त्यामुळे पुन्हा पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याची गरज काय आहे? मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर आणि महाराष्ट्रात सर्वाधिक बोलली लिहिली जाणारी भाषा मराठी असताना महाराष्ट्रात हिंदीचे आक्रमण का होत आहे? जिथे गरज असते तिथे महाराष्ट्रातील हिंदीच्या गरजेला कोणीही रोखलेले नाही, मराठीही व्यवहारात यावी असा आग्रह जरूर आहे. मात्र केवळ मराठीच व्यवहारात असावी, अशीही सक्ती महाराष्ट्राने आजपर्यंत केलेली नाही. बँक, रेल्वे, केंद्राच्या अखत्यारित येणाऱ्या विविध विभागांच्या कार्यालयात मराठी माणूस किंवा इतर सर्वभाषिकही हिंदीतच संवाद साधतो, हे पुरेसे नाही का? जेवढी गरजेची आहे, तेवढी हिंदी इथे बोलली लिहिली जाते. हिंदी सिनेमे मराठीच्या तुलनेत जास्तच पाहिले जातात. हिंदी मालिका, हिंदीचा प्राईम टाईम आणि हिंदी चित्रपटांसाठी रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी सिनेमागृहे आरक्षित केली जातातच की. मुंबईतल्या किंवा महाराष्ट्रातल्या हिंदी भाषेवर पूर्वापार हिंदी सिनेजगताचा प्रभाव आहे. साहित्यातील हिंदी किंवा प्रमाण हिंदी भाषा देशातल्या कोणत्या राज्यात किंवा शहरात बोलली जाते? अगदी हिंदी भाषकांची संख्या जास्त असलेल्या दिल्ली किंवा उत्तरेकडील राज्यांमध्येही स्थानिक लोकभाषा असलेली भोजपुरी किंवा तत्सम लहेजा असलेल्याच भाषा बोलल्या जातात, मग हिंदीचा आग्रह महाराष्ट्रासाठी गैरलागू होत नाही का?

इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याची किंवा शिकण्याची गरज निर्माण करण्यामागे भविष्यातील सत्तेचे स्पष्ट राजकारण आहे. भाजप किंवा काँग्रेससारखे राष्ट्रीय पक्ष हिंदीला विरोध करू शकत नाहीत, त्यामुळे ही जबाबदारी प्रादेशिक पक्षांवरच आहे. मनसेसारखा एखादा पक्ष सोडल्यास इथल्या प्रादेशिक पक्षांकडूनही या निर्णयाला पुरेसा विरोध होताना दिसत नाही. हिंदी मराठी भाषकांमध्ये राज्यातील मोठ्या शहरात होणारे वाद नवे नाहीत, महाराष्ट्र आणि मराठी भाषा संस्कृती केवळ गुढीपाडव्याला शोभायात्रेपुरतीच उरली आहे का? महाराष्ट्रातील कोकण, मराठवाडा, विदर्भ सगळ्याच भागातील मराठीत हिंदीचे मिश्रण झालेले नाही काय? महाराष्ट्रात याआधीच अमराठी भाषिकांची त्यातही हिंदी बोलणाऱ्यांची संख्या वाढत असताना त्यात आणखी पहिलीपासून हिंदीची शिकवणी देण्याची गरज नाही. खरंतर अशा परिस्थितीत मराठीवर होणारे इतर भाषांचे आक्रमण रोखण्याची गरज असताना हिंदी लादण्याचे कारण केंद्रातील सत्ता धोरणाचे फलित आहे. 'रामराम' किंवा 'जय हरी पांडुरंग'च्या जागेवर 'जय श्रीराम'चा जयघोष आपण मान्य केलाच आहे. प्रश्न धार्मिक घोषणेचा नाही. केंद्रातील भाषेच्या माध्यमातून राज्यांच्या स्थानिक भाषांना डावलून बाजूला करणे. त्यानंतर त्या ठिकाणी आपल्या राजकीय सोयीची भाषा-संस्कृती बसवणे हा हेतू स्पष्ट आहे.

हिंदी किंवा इतर कोणत्याही राज्यातील स्थानिक भाषकांनी महाराष्ट्रात आल्यावर मराठी निदान बोलायला शिकायला हवे, यात काहीच दुमत असण्याचे कारण नाही. देशातील दक्षिणेकडील, उत्तरेकडील, पूर्वेकडील किंवा इशान्येकडील राज्यांमध्ये तेथील स्थानिक संस्कृतीत हिंदीचा आग्रह मान्य केला जाईल का? मग महाराष्ट्रातच हा प्रयत्न का केला जात आहे? गरजेइतकी हिंदी येथील मराठी भाषकांनाही येतेच की, महाराष्ट्रात किंवा मुंबई, पुणे, ठाणे, औरंगाबाद, नागपूरमध्येही हिंदी बोलली जातेच की, दोन प्रादेशिक भाषकांना संवादासाठी हिंदी गरजेचे आहे, मात्र महाराष्ट्रात दोन मराठी माणसेही भेटल्यावर हिंदीच संवाद साधतात, इतकी हिंदी इथे रुजवलेली असताना पहिलीपासून हिंदीची सक्ती गरजेची नाही. केंद्रातील सत्तेकडून राज्यांच्या स्थानिक संस्कृती अस्मितांमध्ये घुसखोरीचा हा प्रयत्न केवळ राजकीय आहे. भाषेच्या मार्गाने संस्कृती आणि विचार रुजवले जातात, रुजवलेल्या विचारातून सत्तेला पोषक वातावरण निर्माण करता येते. जगातल्या सर्वच निरंकुश सत्तांनी आधी भाषेतच घुसखोरी करून स्थानिकांच्या अस्तित्वाला आव्हान दिल्याचा इतिहास आहे. भाषा बदलल्यानंतर संस्कृती आणि इतिहास बदलतो. त्यानंतर सत्ता बदलण्याचा मार्ग मोकळा होतो. महाराष्ट्रात सर्वभाषिक राहतात, गुजराती, तमिळ, तेलुगू, उत्तरेकडील राज्यातून आलेली मंडळी, पंजाबी, सिंधी आदी सर्वच लोक महाराष्ट्रात त्यांच्या भाषा संस्कृतीसह राहातात. देशातील इतर प्रादेशिक भाषांच्या तुलनेत मराठीने खूप आधीपासून हे औदार्य काकणभर जास्तच दाखवले आहे, असे असताना 'त्याउपर' हिंदीचे आक्रमण का केले जात आहे. रेल्वेची तिकीटे, उद्घोषणा, बँकेच्या स्लीप, मोबाईलमधल्या सार्वजनिक संदेशातील हिंदी भाषा ही मराठी आणि इतर सर्वच भाषकांना समजते की, इयत्ता पहिलीच्या वर्गात 'गमभन' आणि 'अआइई' अशी मराठीतली अक्षरओळख शिकल्यावर सारखीच लिपी असलेली हिंदी वेगळी शिकण्याची गरज काय? प्रादेशिक पक्षांच्या अस्तित्वाचा पाया ही स्थानिक भाषाच आहे. हिंदीच्या माध्यमातून या पायाला धक्का देण्याचे प्रयत्न सर्वांनीच मिळून परतवून लावायला हवेत. मनसे आणि शिवसेनेच्या ठाकरे गटाने त्यासाठी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रातील इतर सर्वच स्थानिक पक्षांनीही हिंदीचे हे होणारे आक्रमण परतवून लावायला हवे.

# गरजले तर खरे, पण बरसतील का?

गेली सुमारे तीन वर्ष महाराष्ट्रातील राजकारण अनेक वळणे घेत असल्याचे दिसते. ही सर्व अनपेक्षितच वळणे आहेत. त्यातही शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दोन-दोन तुकडे झाल्यानंतर कायमच कुरघोड्यांचे राजकारण सुरू झाले. त्यात भाषेचा स्तर घसरला, वैयक्तिक टीकाटिप्पणी केली जात आहे. नीतिमत्तेशी तर या राजकारण्यांचे काहीच देणेघेणे नाही. असा सर्व स्वार्थाचा आणि सर्वसामान्यांच्या आयुष्याशी खेळ सुरू असताना शनिवारी महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा आपले बंधू आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासमोर टाळीसाठी हात पुढे केला. यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. पण त्याचबरोबर काही अटीही ठेवल्या. त्यामुळे राज्यात ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेला उधाण आले आहे.

यूट्यूबवरील आपल्या 'वास्तव मे ट्रुथ' या पॉडकास्ट कार्यक्रमात अभिनेता आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी राज ठाकरे यांना 'ठाकरे बंधू पुन्हा एकत्र येणार का?' असा प्रश्न विचारला होता. त्यावर, 'महाराष्ट्र आणि मराठी माणसाच्या अस्तित्वासमोर आमची भांडणे, वाद या गोष्टी अतिशय क्षुल्लक आहेत. एकत्र येणे आणि एकत्र राहणे, यात काही कठीण आहे असे वाटत नाही,' असे राज ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनीही याला लगेच प्रतिसाद दिला. मराठीसाठी तसेच महाराष्ट्राच्या हितासाठी आपण किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला तयार आहोत. आपल्याकडून कोणतेच भांडण नव्हते आणि असतील तर आजच मिटवून टाकतो, असे सांगत अनुकूलता दर्शवली. पण त्याचबरोबर महाराष्ट्र हिताच्या आड येणाऱ्यांचे स्वागत करणार नाही, हे पहिल्यांदा ठरविले पाहिजे, अशी अटही त्यांनी घातली. भाजप तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेना नेत्यांशी राज ठाकरे यांच्या वरचेवर होणाऱ्या भेटीगाठींवर हा रोख होता.

राजकारणात उतरणाऱ्याला दाखवण्यासाठी आक्रमक भूमिका पण डोकं शांत ठेवून सर्व चाली खेळाव्या लागतात. विशेष करून तुमच्यात मार्केटिंगचे स्किल असले पाहिजे, जसे एस्किमोंनाही बर्फ विकता आला पाहिजे. ठाकरे बंधूंनी शनिवारी केलेल्या वक्तव्यावरून तेच दिसते. ठाकरे बंधूंनी मराठी आणि महाराष्ट्र हिताला प्राधान्य असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला. मग प्रश्न असा निर्माण होतो की, गेल्या २० वर्षात महाराष्ट्र आणि मराठी हिताला प्राधान्य नव्हते का? शिवसेनेतून बाहेर पडत राज ठाकरे यांनी वेगळी चूल मांडली. २००६ साली त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली. तेव्हापासून आतापर्यंत या दोन्ही नेत्यांचा प्राधान्यक्रम काय होता? याचा आणखी एक अर्थ असा होतो की, सध्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोघांचीही ज्या पक्षांबरोबर जवळीक आहे, त्यांचे या दोन्ही गोष्टींना प्राधान्य नाही किंवा त्यांच्याकडून या दोहोंनाही धोका आहे!

दुर्दैवाने, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या यशाचा आलेख उतरताच आहे. १३ आमदारांवरून शून्य आमदारापर्यंत घसरणच दिसते. खासदारकीचे खाते कधी उघडलेच नाही. या उलट, मनसेच्या निर्मितीनंतर जवळपास सहा वर्षांनी स्थापन झालेल्या आम आदमी पार्टीने साधारणपणे १० वर्षांतच राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळवला. कदाचित, दर पाच वर्षांनी मनसेच्या बदलणाऱ्या भूमिका, हे एकमेव कारण या घसरणीमागे असावे, असे वाटते. २०१४ च्या निवडणुकीत मनसेने भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाला पाठिंबा दिला होता. तर, २०१९ मध्ये त्यांनी याच्या अगदी विरुद्ध भूमिका घेतली. राज ठाकरे यांनी राज्यात १० सभा घेतल्या. सभास्थानी दोन-दोन स्क्रीन लावून राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आश्वासनांचा पंचनामा केला. यातूनच त्यांचा 'लाव रे तो व्हिडीओष्ठ' हे वाक्य सोशल मीडियावर हिट झाले.



मनसेचा एकही उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात नव्हता, हे विशेष. पण बरोब्बर पाच वर्षांनी राज ठाकरे यांनी भूमिका बदलली आणि त्यांनी 'देशाच्या विकासासाठी नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा' जाहीर केला. हीच बाब उद्धव ठाकरे यांनी हेरली. एकदा पाठिंबा द्यायचा, नंतर विरोध करायचा, मग पुन्हा तडजोड करायचीष्ठ हे असे चालणार नसल्याचे त्यांनी ठणकावले आहे. ते गांभीर्याने घेतले जाईल का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. एकूणच, सर्वसामान्यांच्या प्रतिक्रिया बघता अनेक जणांना ठाकरे बंधूंनी एकत्र यावे, असे वाटते. पण मुख्य अडचण होते की, पक्षातील अन्य नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची. राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा मित्र नसतो आणि शत्रूही नसतो, असे म्हटले जाते. यात तथ्य असले तरी, याची दुसरी बाजू अशी की, हे फक्त वरिष्ठ पातळीवर असते. राजकीय व्यासपीठावरून एकमेकांवर टीका करणाऱ्या, आरोप करणाऱ्या बड्या नेत्यांमध्ये सौहार्दाचे संबंध असतात. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांची मैत्री तर सर्वश्रुतच होती. त्यामुळे त्यांच्या तडजोडी सुरूच असतात, पण कार्यकर्ते मात्र एकमेकांची डोकी फोडतात.

त्याशिवाय, इतर नेत्यांचीही गोची होते. शनिवारी ठाकरे बंधूंनी दिलजमाईची तयारी दर्शवली असतानाच, दुसरीकडे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज ठाकरे यांच्यावर तोंडसुख घेतले. त्यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानाला 'कॅफे' संबोधले. या कॅफेत बसून वेगवेगळ्या कल्पनांचे पतंग उडवले जातात. पण राज ठाकरे यांचे कुठलेच पतंग वरपर्यंत जात नाही. त्यांचे सर्व कटी पतंगच आहे, अशी टीका त्यांनी माध्यमांशी बोलताना केली होती. पण अवघ्या काही तासांतच ठाकरे बंधूंनी एकमेकांना टाळी देण्याची तयारी दर्शवताच, संजय राऊत यांची भाषा बदलली आणि लगेच 'राज साहेब' झाले.

अशीच स्थिती मनसे नेते संदीप देशपांडे यांची झाली. ठाकरे गट आता पवार गट आणि काँग्रेसला धोका देण्याच्या तयारीत, अशा धोका देणाऱ्या पक्षावर आम्ही विश्वास ठेवायचा, तर तो कोणत्या मुद्यावर ठेवायचा, हा प्रश्न माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला पडतो आहे, असे त्यांनी शनिवारी म्हटले होते. लगेच दुसऱ्या दिवशी रविवारी त्यांनी भूमिका बदलली. एकत्र येणे म्हणजे निवडणुकीसाठीच एकत्र यायला पाहिजे, असे नाही. मराठी आणि महाराष्ट्राच्या हिताच्या मुद्यासाठीही एकत्र येऊ शकतात, असा खुलासा त्यांनी केला आहे. वास्तविक, संदीप देशपांडे यांनी मांडलेली भूमिका योग्य आहे. २०१९च्या निवडणुकीच्या प्रचारात, बाकी सर्व नेत्यांना भाजपत घ्या, पण शरद पवार यांना घेऊ नका, अशी विनंती भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांना करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी आपली मुख्यमंत्रिपदी निवड झाल्याचे श्रेय मात्र, शरद पवार यांनाच दिले आहे. तर, शरद पवार यांनी जातीपातीचे राजकारण केले, असा थेट आरोप राज ठाकरे यांनी वारंवार केला आहे. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र आलेच तर, शरद पवार यांचे त्यात स्थान काय असेल?

एक अशीही चर्चा आहे की, या दोघांना एकत्र आणण्यामागे भाजपची चाल आहे. महाराष्ट्राचे राजकारण 'ठाकरे' आणि 'पवार' या नावांशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. याची कल्पना भाजपाला आहे. त्यातच महायुतीत सुरू असलेली धुसफूस लपून राहिलेली नाही. एकूणच भाजपचे 'हुडी'चे राजकारण लक्षात घेता, ही शक्यता ठामपणे नाकारता येणार नाही.

# जीवघेणे ठरताहेत फटाक्यांचे कारखाने

भारतात शोभेची दारू, फटाके तयार करणारे कारखाने कामगारांच्या मुळावर येत आहेत. प्रामुख्याने परवानगी न घेता काम करणारे किंवा नियम ओलांडत फटाक्यांची निर्मिती करणाऱ्या कारखान्यातील कामगारांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे. यावर्षी फटाक्यांच्या कारखान्यांतील स्फोटांत ४० जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनांमागचे सर्वात मोठे कारण म्हणजे नियमांचे पालन न करणे.

एक एप्रिल रोजी गुजरातच्या बेकायदा काम करणाऱ्या फटाक्याच्या कारखान्यात स्फोट होऊन २१ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. हा स्फोट एवढा तीव्र होता की, मृतदेहांचे तुकडे झाले आणि ते २०० ते ३०० मीटर लांब फेकले गेले. बहुतांश मृत व्यक्ती मध्य प्रदेशातील हदर आणि देवास जिल्ह्यांतील होते. आणखी एक दुर्घटना पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात घडली. तेथे फटाक्यांचा कारखाना आणि गोदामात भीषण आग लागून एका कुटुंबातील आठ जण मृत्युमुखी पडले. मृतांत चार मुलांचा समावेश आहे. याप्रकरणी कारखाना मालकाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. एकूणातच गेल्या साडेचार महिन्यांत भारतात विविध कारखान्यांतील स्फोटात ४० जण ठार झाले. यापूर्वी फेब्रुवारी २०२४ मध्ये मध्य प्रदेशातील एका फटाका कारखान्यात स्फोट झाल्याने ११ जण ठार झाले आणि १५० हून अधिक जखमी झाले होते.

तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यातील शिवाकाशी हे भारतातील फटाके निर्मितीचे केंद्र मानले जाते. विरुधुनगर येथे एक हजारापेक्षा अधिक फटाक्यांचे कारखाने आहेत आणि तीन हजारांपेक्षा अधिक दुकाने. फटाका कारखान्याशी



संबंधित सर्वाधिक दुर्घटनादेखील शिवाकाशीत होत राहतात. त्याचवेळी काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्यावरही परिणाम होतो. एका बातमीनुसार, २०२३ आणि २०२४ मध्ये विरुधुनगर येथे फटाक्यांच्या कारखान्यांत २७ दुर्घटना झाल्या आणि त्यात ७० जणांचा बळी गेला. या दुर्घटनेचे विश्लेषण केल्यास रासायनिक पदार्थांची गरजेपेक्षा अधिक साठवणूक करणे आणि मजुरांची संख्यादेखील अधिक असणे, हे कारण सांगितले जाते. विरुधुनगर येथे जवळपास निम्मी लोकसंख्या ही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फटाका उद्योगाशी जोडलेली आहे. या ठिकाणचे कोरडे वातावरण आणि उष्णता फटाकेनिर्मितीला पोषक आहे. या ठिकाणी फटाका उद्योगाने २०२०-२१ मध्ये ११२ कोटी रुपयांचा कर भरला आहे.

फटाका कारखान्यात होणाऱ्या दुर्घटनांचे सर्वात मोठे कारण म्हणजे नियमांचे पालन न करणे. गेल्यावर्षी मध्य प्रदेशातील फटाका कारखान्यात झालेला स्फोट हा गरजेपेक्षा अधिक फटाके बाळगल्यामुळे झाला होता. तेथे गरजेपेक्षा अधिक फटाक्यांची निर्मिती केली जात होती. कारखाना संचालकाकडे केवळ पंधरा किलो स्फोटक तयार करण्याचा परवाना होता; मात्र कारखान्यात त्यापेक्षा अधिक पटीने स्फोटक साहित्य होते. या कारखान्यात यापूर्वीदेखील अनेक स्फोट झाले, तरीही फटाक्यांची निर्मिती सुरूच होती. २०२१ मध्ये विरुधुनगर येथील एका फटाका कारखान्यातील स्फोटाने २७ जणांचा मृत्यू झाला. त्याच्या तपासासाठी नॅशनल ग्रीन ट्रिब्यूनलने (एनजीटी) एक समिति स्थापन केली. या समितीने चौकशी केली असता कारखान्याकडे परवानग्या होत्या; मात्र त्यांनी स्फोटक नियम २००८ याचे पालन केलेले नसल्याचे सिद्ध झाले. 'स्फोटके साठवणूक नियम २००८' मध्ये फटाक्यांची निर्मिती, वाहतूक आणि विक्रीबाबतची नियमावली दिली आहे.

# धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना लवकरच ना हरकत प्रमाणपत्र; शिवसेनेच्या शिष्टमंडळाला सिडकोचे आश्वासन

**नवी मुंबई : धनश्री सट्टा**

नवी मुंबईतील धोकादायक इमारतींमधील घर खरेदी केल्यानंतर सिडको मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे नागरिकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत होता. प्रमाणपत्र मिळविण्यासाठी लाखापेक्षा अधिक प्रकरणे सिडको मंडळाकडे प्रलंबित आहेत अशा तक्रारी होत्या. दरम्यान, हे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू केली जाईल, असे आश्वासन सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांनी मंगळवारी शिवसेना (शिंदे गट) शिष्टमंडळाला दिले. शिवसेना (शिंदे गट) खासदार नरेश म्हस्के आणि पक्षाचे बेलापूर जिल्हा प्रमुख किशोर पाटकर यांनी सिडको आणि नवी मुंबई शहराशी संबंधीत असलेल्या प्रश्नाबाबत संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली. नवी मुंबई परिसरात सिडकोच्या धोकादायक



इमारतींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया वेगाने सुरू असून नवी मुंबईची आभाळरेषा यामुळे बदलणार आहे. पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असलेल्या इमारतींमधील घरांचे दरही गगनाला भिडले आहेत. यापैकी काही घरांची खरेदी विक्री प्रक्रिया सिडकोकडून वेळेत ना हरकत दाखला मिळत नसल्यामुळे रखडल्याचे चित्र होते. काही ठिकाणी घर गहाण ठेवून कर्ज घेण्यासाठी आवश्यक असलेला दाखलाही सिडकोकडून मिळत नसल्याच्या तक्रारी होत्या. एखादे घर पुनर्विकासाच्या प्रक्रियेत आल्यानंतर त्याचे खरेदी-विक्री व्यवहार मालमत्तांचे हस्तांतरण होत नसल्यामुळे ठप्प झाल्याच्या तक्रारी होत्या. अशा प्रकारची एक लाखाहून अधिक प्रकरणे सिडकोकडे प्रलंबित असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रमुख किशोर पाटकर यांनी मंगळवारी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांच्याकडे केल्या.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, यांचे कार्यालय**
**Email : presidency.ee@mahapwd.com**
☎२२०१६९७५/७७
२२०१६९७३
**ई-निविदा सुचना क्र. ०३ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई-०१ (दुरध्वनी क्र. २२०१६९७५/७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून **अनुभवी कंत्राटदार व पुरवठादार** यांच्याकडून खालील कामाकरीता **"बी-१"** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) पध्दतीने मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **http://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे नाव :-**
1. Annual Housekeeping to dharavi Office & Premises, Passage & Toilet Blocks at Fort Mumbai.. **(Est Cost Rs. 9,66,836/-)**
2. Annual Housekeeping to Town Hall Building Premises, Passge & Toilet Blocks at Fort Mumbai. **(Est Cost Rs.22,72,985/-)**
3. Annual Housekeeping to Govt. Rest House & HRC, MAC, SIAC Premises at Fort Mumbai. **(Est Cost Rs.23,45,631/-)**
4. Annual Housekeeping to Ensahutment Premises & Toilet Blocks at Fort Mumbai. **(Est Cost Rs.21,56,068/-)**
5. Annual Housekeeping to Bel Heaven Building Mumbai. **(Est Cost Rs.40,50,339/-)**

**ई-निविदा उपलब्ध कालावधी-** दि. २१.०४.२०२५ ते दि. २९.०४.२०२५ पर्यंत
**ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)** दि. ३०.०४.२०२५ रोजी

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

V. Aldaste
(वि.अ.पाटसकर)
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग मुंबई

**जा.क्र. काअ/इशवि/भांडार/ई-निविदा/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१**
**दूरध्वनी क्र. २२०१६९७५/७७**
**दिनांक :-**

डीजीआयपीआर/ २०२५-२०२६/३०७

# अती पाणी प्यायल्यास होऊ शकते नुकसान

शरीर निरोगी ठेवण्यासाठी, पुरेसे पाणी पिणे महत्वाचे आहे. पुरेशा प्रमाणात पाणी प्यायल्याने पचनसंस्था निरोगी राहते आणि चेहऱ्यावर चमक येते. शरीरातील पाण्याची कमतरता ही खूप गंभीर समस्या आहे. पाण्याच्या कमतरतेमुळे अनेक गंभीर आजार होऊ शकतात आणि अंतर्गत अवयवांचे नुकसान होऊ शकते. पाण्याअभावी पोट आणि पचनसंस्थेशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. पाणी पिणे शरीरासाठी फायदेशीर समजले जाते. मात्र, अती प्रमाणात पाणी प्यायल्याने शरीरावर त्याचा दुष्परिणाम होऊ शकतो. अन्न किंवा द्रवातून शरीरात प्रवेश करणारे पदार्थ शेवटी रक्ताद्वारे किडनीपर्यंत



पोहोचतात. मूत्रपिंड शरीरात जाणारे अतिरिक्त पाणी फिल्टर करतात आणि ते लघवीच्या स्वरूपात बाहेर टाकतात. यामुळे मूत्रपिंडातील द्रवपदार्थांचे संतुलन नियमित राहते. मूत्रपिंड देखील त्याच्या क्षमतेनुसार रक्त फिल्टर करते. जर मूत्रपिंडावर जास्त दाब पडला तर मूत्रपिंडाच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. ज्यामुळे किडनीचे आजार होऊ शकतात. डॉक्टरांच्या मते, गरजेपेक्षा जास्त पाणी प्यायल्याने मूत्रपिंडाचे आरोग्य बिघडते. मूत्रपिंडे प्रति तास फक्त ०.८ किंवा १ लीटर पाणी फिल्टर करू शकतात. जर यापेक्षा जास्त प्रमाणात पाणी असेल तर अतिजलीकरण होऊ शकते. जास्त पाणी प्यायल्याने रक्तातील सोडियमची पातळी कमी होते. यामुळे नशा किंवा हायपोनेट्रेमिया देखील होऊ शकतो. अति-जलीकरणामुळे मूत्रपिंडाच्या कार्यावर देखील परिणाम होऊ शकतो. शरीर आणि मूत्रपिंड निरोगी ठेवण्यासाठी दिवसभरात ३ ते ४ लीटर पाणी पिणे पुरेसे मानले जाते. हे प्रमाण ६ लीटरपर्यंत देखील पोहोचू शकते.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.** • Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# बनावट पनीर विक्रेत्यांवर एफडीएची नजर, ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांचे परवाने रद्द होणार

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

बनावट पनीर किंवा चीज ॲनालॉगचा वापर करणारे वा विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय अन्न व औषध प्रशासन विभागाने घेतला आहे. पनीरसारख्या बनावट पदार्थाची विक्री केल्याचे आढळल्यास संबंधित व्यावसायिकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला आहे. चोखंदळ खवय्यांकडून पनीरला प्रचंड मागणी आहे. विशेषतः लहान मुले मोठ्या प्रमाणावर पनीरच्या पदार्थांना पसंती दर्शवतात. मात्र काही ठिकाणी बनावट पनीर अथवा 'चीज ॲनालॉग' वापरून ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तपासणीत आढळून आले आहे. अशा प्रकारे ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या पनीर विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, तसेच २०११ आणि २०२२ मधील नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा झिरवाळ यांनी दिला. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ च्या कलम १८ (२) (ई) नुसार, ग्राहकांना अन्नपदार्थातील घटकांची



माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच, अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग आणि डिस्प्ले) नियमन २०२० च्या प्रकरण ३ मधील नियमन ९ (६) नुसार, अन्न व्यावसायिकांनी अन्नपदार्थांची विक्री करताना पोषण संबंधित आणि त्यातील घटकांची माहिती, तसेच आरोग्य संदेश प्रदर्शित करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अन्न सुरक्षा आणि मानके (लेबलिंग व डिस्प्ले नियमन) २०२० च्या नियमांनुसार, रेस्टॉरंट, हॉटेल, कॅटरर्स आणि फास्ट फूड विक्रेत्यांनी आपले मेनू कार्ड्स, डिस्प्ले बोर्ड्स आणि ऑर्डर यंत्रावर अचूक माहिती देणे अनिवार्य आहे. रेस्टॉरंट, हॉटेल व फास्ट फूड व्यावसायिकांकडून ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील चीज ॲनालॉग वितरकांच्या खरेदी-विक्री बिलांची तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

# 'मेट्रो ८' मार्गिका आता लोकमान्य टिळक टर्मिनसला जोडणार

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

'छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय मुंबई विमानतळ-नवी मुंबई विमानतळ मेट्रो ८' मार्गिकेचा आराखडा अखेर सिकडोने तयार केला असून हा आराखडा लवकरच राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे. सिडकोने मूळ आराखड्यात काहीसा बदल करून ही मार्गिका आता दोन ३३७ किमी लांबीच्या मेट्रो प्रकल्पातील 'मेट्रो ८' मार्गिकेची उभारणी एमएमआरडीए आणि सिडको संयुक्तपणे करणार होते. मात्र नगर विकास विभागाने २७ जानेवारी २०२५ रोजी एक शासन निर्णय प्रसिद्ध करून या मार्गिकेची सार्वजनिक-खासगी सहभागातून उभारणी करण्याचा निर्णय घेतला. तसेच आराखड्यासह निविदा प्रक्रिया



विमानतळांबरोबरच मुंबईतील महत्त्वाच्या अशा लोकमान्य टिळक टर्मिनसशी जोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठीच आराखड्यात लोकमान्य टिळक टर्मिनस मेट्रो स्थानक समाविष्ट करण्यात आले आहे. लोकमान्य टिळक टर्मिनसवरून सध्या महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसाठी मोठ्या संख्येने गाड्या सुटत नाहीत. टर्मिनस मेट्रोने जोडल्यास भविष्यात येथून महाराष्ट्राच्या इतर भागासाठी सोडण्यात येणाऱ्या रेल्वे गाड्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) राबवून प्रकल्पाची उभारणी करण्याची जबाबदारी सिडकोवर सोपविण्यात आली. त्यानुसार 'मेट्रो ८'चा सुधारित आराखडा नुकताच सिडकोने तयार केल्याची माहिती सिडकोतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

आराखड्यानुसार ही मार्गिका ३५ किमी लांबीची असून यापैकी मुंबई विमानतळ – छेडानगर दरम्यानची ९.२५ किमी लांबीची मार्गिका भुयारी आहे. छेडानगर-नवी मुंबई विमानतळादरम्यान मेट्रो ८ मार्गिका उन्नत असणार असून उन्नत मार्गिकेची लांबी २५.६३ किमी असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# यंदाही मुंबईकरांच्या माथी खड्डेच... पण खर्च मात्र कमी

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

मुंबई महापालिकेने खड्डेमुक्त रस्त्यांसाठी रस्ते कॉंक्रीटीकरणाचा महाप्रकल्प हाती घेतला आहे. मात्र या कॉंक्रीटीकरणामुळे खड्डे कमी झाले का याचे उत्तर येत्या पावसाळ्यातच मिळू शकणार आहे. रस्ते कॉंक्रीटीकरणाच्या कामाने वेग घेतल्यामुळे येत्या पावसाळ्यात खड्डे बुजविण्याचा



खर्च तब्बल ५० टक्क्यांनी कमी होईल, असा विश्वास पालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे. गेल्यावर्षी तब्बल १६ हजारांहून अधिक खड्डे बुजवण्यात आले होते व त्यासाठी दीडशे कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. यंदा खड्डे बुजविण्यासाठी ७९ कोटी रुपये खर्च प्रशासनाला अपेक्षित आहे. मुंबईत दरवर्षी पावसाळ्यात पडणाऱ्या खड्डयांमुळे मुंबई महापालिकेवर टीका होते. डांबरी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडतात. कॉंक्रीटच्या रस्त्यावर खड्डे पडत नाहीत. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून मुंबई महापालिकेने खड्डेमुक्त रस्त्यांसाठी रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाचा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाअंतर्गत टप्प्याटप्प्याने रस्ते कॉंक्रीटीकरण करण्यात येत आहे. मुंबईत आतापर्यंत १२०० किमीहून अधिक रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण पूर्ण झाले आहे. सध्या एकाच वेळी मुंबईतील ७०१ किमी लांबीच्या रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. या रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाची कामे वेगात सुरू आहेत. कॉंक्रीटीकरणाची कामे सुरू असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असते. त्यामुळे यंदा पावसाळ्यात मुंबई महापालिकेला सुमारे दीडशे किमी लांबीच्या रस्त्यावरील खड्डेच बुजवावे लागणार आहेत. रस्ते कॉंक्रीटीकरणाची कामे जसजशी पूर्ण होत आहेत, तसतसा खड्डे भरणीचा खर्च आणि नागरिकांना होणारा त्रास कमी होईल, असा विश्वास पालिका अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# शासकीय भूखंडाची खासगी ट्रस्टकडून विक्री; ट्रस्टला ५३९ कोटी, शासनाला ५१ कोटी!

■ **मुंबई : विशाल कारंडे**

बोरिवली येथील मुंबई खादी ग्रामोद्योग असोसिएशन उर्फ 'कोरा केंद्र' या खासगी ट्रस्टला दिलेला भूखंड अटी-शर्तीचा भंग केल्याप्रकरणी उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी परत घेण्याचे आदेश दिले होते. परंतु याच भूखंडापैकी पावणेचार एकर भूखंड उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनीच ५१ कोटी आकारून मालकी हक्काने दिला आणि आता हा भूखंड एका खासगी विकासकाला ५३९ कोटी रुपयांना विकण्यात ट्रस्टला यश आले आहे. बोरिवलीतील हा भूखंड विक्रीसाठी जादा दर मानला जात आहे.

कोरा केंद्र या खासगी ट्रस्टला राज्य शासनाने ३९ एकर १७ गुंठे इतका भूखंड १९५६ मध्ये दिला होता. खादी ग्रामोद्योगाचा प्रसार करीत असल्याचा





दावा करत कोरा केंद्राने या भूखंडाचा वापर शाही विवाहसोहळे, गरबा नाईट, खासगी पार्ट्यांसाठी प्रामुख्याने केला. या भूखंडाच्या एका कोपऱ्यात खादी ग्रामोद्योग प्रदर्शन भरविले. या भूखंड वितरणाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते रेजी अब्राहम यांनी पहिल्यांदा केली. या तक्रारीत तथ्य आढळल्यानंतर तत्कालीन उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी १७ एकर भूखंड परत घेण्याचे आदेश डिसेंबर २०१७ मध्ये दिले. या आदेशाविरुद्ध ट्रस्टने विभागीय आयुक्तांकडे अपील केले. तेही नोव्हेंबर २०१८ मध्ये फेटाळण्यात आले. त्यानंतर ट्रस्टने तत्कालीन महसूल मंत्र्यांकडे धाव घेतली. मात्र महसूल मंत्र्यांनी उपनगर जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश कायम ठेवत भूखंड परत घेण्याचे आदेश उपनगर जिल्हाधिकाऱ्यांना दिले. महसूल मंत्र्यांच्या या आदेशाविरुद्ध ट्रस्टने उच्च न्यायालयात धाव घेतली. आपली बाजू ऐकून घेतली नाही, असा ट्रस्टचा दावा न्यायालयाने मान्य करीत पुन्हा सुनावणी घेण्याचे आदेश तत्कालीन महसूल मंत्र्यांना दिले. यावेळी मात्र महसूल मंत्र्यांनी उपनगर जिल्हाधिकारी तसेच विभागीय आयुक्तांचा आधीचा आदेश फेटाळला आणि ट्रस्टचा भूखंड वाचला.

# प्रार्थना स्थळाच्या पाडकामाविरोधात आंदोलन, आंदोलनाला राजकीय नेत्यांचाही पाठिंबा

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

विलेपार्ले पूर्व येथील कांबळीवाडी परिसरातील ३० वर्षे जुन्या प्रार्थना स्थळावरवर महानगरपालिकेने बुधवारी तोडक कारवाई केली. या कारवाईच्या निषेधार्थ विशिष्ठ समाजातील नागरिकांनी शनिवारी मोर्चा काढला होता. या मोर्चात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी पालिकेविरोधात घोषणाबाजी केली. या आंदोलनात विविध राजकीय पक्षांचे नेतेही सहभागी झाले होते. दरम्यान, याप्रकरणी के-पूर्वी विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्तांची तडकाफडकी बदली करण्यात आली. विलेपार्ले येथील एका इमारतीच्या वाहनतळाच्या जागेत हे प्रार्थना स्थळ होते. त्या जागेबाबत अनेक वर्षापासून वाद सुरू होता. याप्रकरणी न्यायालयीन लढा देखील सुरू होता. प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच महापालिकेने विलेपार्ले येथील या प्रार्थना स्थळावर १६ एप्रिल रोजी तोडक कारवाई केली. या कारवाईच्या निषेधार्थ शनिवारी सकाळी विलेपार्ले परिसरात मोर्चा काढण्यात आला होता. विलेपार्ले पूर्व स्थानक परिसरापासून पालिकेच्या



के-पूर्व विभाग कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला होता.

मोर्च्यात सहभागी झालेल्या नागरिकांनी पालिकेच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. महापालिकेतर्फे कारवाई करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करावे, महानगरपालिकेने स्वखर्चातून पाडकाम केलेले प्रार्थना स्थळ बांधून द्यावे, तसेच, या घटनेबद्दल पालिकेने जाहीर माफी मागावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. भाजप नेते आणि मंत्री मंगलप्रभात लोढा, कॉंग्रेस नेत्या आणि खासदार वर्षा गायकवाड, आमदार पराग अलवाणी यांच्यासह राजकीय पक्षांतील अन्य स्थानिक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. उद्धव ठाकरे गटाचे आमदार आणि नेते आदित्य ठाकरे, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि खासदार अखिलेश यादव, उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या आणि राज्यसभा खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी या कारवाईविरोधात टीका केली आणि निषेध व्यक्त केला.

# ३७४ भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांच्या चौकशीबाबत शासनाचे मौन

■ **मुंबई : गणेश बागडे**

सरकारी अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचारा बाबत तक्रार मिळाल्यानंतरही शासनाच्या परवानगीशिवाय लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला साधी चौकशीही सुरू करण्यावर बंदी आणणाऱ्या भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील १७-अ कलमामुळे आतापर्यंत ३७४ भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांची चौकशी रखडली. ही बाब माहिती अधिकारातून उघड झाली आहे. त्याच वेळी प्रत्यक्ष लाच घेताना पकडल्या गेलेल्या ३७३ प्रकरणात आरोपपत्र दाखल करण्यासाठी आवश्यक असलेली मंजुरीही प्रलंबित आहे.

राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे एखाद्या भ्रष्ट अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार दाखल झाली तर महासंचालकांच्या परवानगीने तात्काळ प्राथमिक चौकशी सुरू केली जाते. प्राथमिक चौकशीत तथ्य आढळल्यास सदर प्रकरण गोपनीय (ओपन) चौकशीसाठी शासनाच्या मंजुरीसाठी पाठविले जाते. शासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित व्यक्तीची



गोपनीय चौकशी सुरू केली जाते. त्याच्या उत्पन्नाचा स्रोत आणि खर्च पाहून तो ज्ञात स्त्रोतापेक्षा दहा ते १५ टक्के अधिक खर्च करीत असल्यास त्याच्याविरुद्ध पुढील कारवाई केली जाते.

मात्र २६ जुलै २०१८ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यात १७-अ या नव्या कलमाचा समावेश केल्यामुळे, सरकारी अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार आल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाला थेट चौकशी सुरू करण्यावर बंधन आले. राज्य शासन तसेच सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेतल्यानंतरच चौकशी सुरु करता येत होती. एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्यावर विनाकारण अन्याय होऊ नये, यासाठीच राज्य शासनाने कायद्यात सुधारणा केल्याचे त्यावेळी सांगण्यात आले. परंतु आता कितीही गंभीर तक्रार आली तरी साधी चौकशी करण्यावरही आता लाचलुचपत प्रतिबंधक विभागावर बंधन आले आहे. त्यामुळे संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांचे आता चांगलेच फावले आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांना मिळालेल्या माहितीनुसार, १७-अ नुसार मंजुरीसाठी राज्य शासन तसेच सक्षम प्राधिकरणाकडे अनुक्रमे २२० आणि १५४ अशी ३७४ प्रकरणे प्रलंबित आहेत. यापैकी तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागलेली ३६९ प्रकरणे आहेत. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सतत पाठपुरावा म्हणून स्मरण पत्रे पाठविली जातात. परंतु या पत्रांना प्रतिसाद मिळत नाही, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. शासन तसेच सक्षम प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये सर्वाधिक प्रकरणे नगरविकास (८८) विभागातील आहेत. त्या खालोखाल महसूल (६०), ग्रामविकास (५२), सार्वजनिक बांधकाम (३२), गृह (२१), उद्योग (१९), शालेय शिक्षण आणि आरोग्य (प्रत्येकी १८), कृषि (१५), सहकार (९) आदींचा क्रमांक लागतो.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.**

**ई-निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२५ -२०२६**

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ योग्य कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब -२ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांतर्गत नागला बीट सर्व्हे क्र. ७३, कशेडी गाव-वाघडोंगरी-फणसपाडा-दिवेकर पाडा-शिलोत्तर-शिलोत्तर रेल्वे क्रॉसिंग आणि सर्व्हे क्र. १६५ पार्ट. सर्जामोरी. शिलोत्तर क्वॉर्टर-कोलांडे आदिवासी पाडा-कोलांडे गाव-कामण रेल्वे क्रॉसिंग-प्रभाकर म्हात्रे प्लॉट-दिवा वसई रेल्वे क्रॉसिंग-शाहबंदर देवी पॉईंट-अजय क्वॉरी, येऊर परिक्षेत्र येथील वन हद्दीवर आर.सी.सी. संरक्षकभिंत बांधणे. | २२,७६,७९,६९२.०० |
| २. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांतर्गत ससुनवघर, सर्व्हे क्र. ३८५ भाग, बोबड पाडा ग्राऊंड-आय.सी.एम.आर. आवारभिंत-सुवी पॅलेस-मैत्री ग्रुप बुरुज-तलाव कोपरा-आनंद ढाबा, आनंद ढाबा-दुर्गा मंदिर-जगन्नाथ मंदिर-सासु पाडा क्वार्टर्स-खाडी किनारा, येऊर परिक्षेत्र येथील वन हद्दीवर आर.सी.सी. संरक्षकभिंत बांधणे. | २३,२०,७१,४३८.०० |
| ३. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांतर्गत सर्वे क्र.१०६ भाग, २७३ गाव बोरीवडे सर्वे क्र. ७९, गाव कासेवर सर्वे क्र.२९१, गाव वेसावे सर्वे क्र.३ आणि ३४ भाग (Adjoining to private land Survey No. ६५, ६६, ६७ & Surya Project), आणि सर्वे क्र.३८५ भाग, पान्हेरी नाला-केतकी नाला- महाराज मंदिर- तळवली पाणी-करनाल पाडा आणि डी.पी.पोळ -बोबड पाडा-बोबड पाडा मैदान, येऊर परिक्षेत्र येथील वन हद्दीवर आर.सी.सी. संरक्षकभिंत बांधणे. | १९,७४,६७,२९३.०० |
| ४. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, मुंबई अंतर्गत विहार नियतक्षेत्रात विहार गेट ते मोरी क्र.१८, मोरी क्र. १८ ते मोरी क्र. १३ ते १ मोरी क्र. १३ ते पंपहाऊस, पंपहाऊस ते बीएमसी भिंतीपर्यंत (उल्टनपाडा) आणि बीएमसी वॉल (उलतानपाडा) ते परशीवाडी, रॉयल पाम ते हेलिपॅड, हेलिपॅड ते खंडाळा घाट, खंडाळा घाट ते बीएनएचएस फिल्मसिटी, बीएनएचएस फिल्मसिटी ते हबळे पाडा, सांजावर हत्तीगेट ते रहेजा संरक्षक भिंत बांधणे. | २१,२२,६२,२९२.०० |

**ई - निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक **१७/०४/२०२५** रोजी **११.००** पासून दिनांक **२४/०४/२०२५** रोजी **१५.००** पर्यंत |
| २ | निविदा पुर्व बैठक | दिनांक **२२/०४/२०२४** रोजी **१५.००** वाजता मुख्य अभियंता यांचे कार्यालय, सा बां. प्रादेशिक विभाग बांधकाम भवन, मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४००००१. |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक **२५/०४/२०२५** सकाळी **१५.१५** वाजता (शक्य झाल्यास) अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, प्रशासकीय इमारत रेशनिंग ऑफिस चेंबूर, मुंबई - ४०००७१. |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. https://mahapwd.com
2. https://mahatenders.gov.in

(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)

३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

**जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./ ७८९**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.**
दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७
दिनांक:- १५/०४/२०२५

**कार्यकारी अभियंता**
**सा. बां. विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.**


**डीजीआयपीआर/ २०२५-२०२६/ २६७**

# एमएचटी सीईटी परीक्षेत गोंधळ, वीज गेल्याने कुर्ला केंद्रावरील एमएचटी सीईटी परीक्षा रद्द

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

एमएचटी सीईटीच्या पीसीएम गटाच्या परीक्षेच्या दुसऱ्या दिवशी कुर्ला येथील आकार कम्युनिकेशन या परीक्षा केंद्रावर सकाळच्या सत्रात अचानक वीज गेली. वीज व इंटरनेट नसल्याने दोन तास विद्यार्थी परीक्षा केंद्रामध्ये बसून राहिले. अखेर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून सकाळच्या सत्रातील परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. मात्र त्या केंद्रावर दुपारच्या सत्रातील परीक्षा सुरळीत पार पडली. या सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा बुधवारी घेण्यात येणार असल्याचे सीईटी कक्षाकडून सांगण्यात आले.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश परीक्षेला १९ एप्रिलपासून सरू झाली. परीक्षेच्या दुसऱ्या दिवशी कुर्ला येथील आकार कम्युनिकेशन या परीक्षा केंद्रावर सकाळी ७ वाजता विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी आले. ९ वाजता परीक्षा सुरू झाल्यानंतर काही वेळातच परीक्षा केंद्रावरील वीज गेली. त्यामुळे परीक्षेसाठी आलेल्या मुलांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. ही समस्या दूर करण्यासाठी केंद्र चालकाला दोन तास लागले. तोपर्यंत विद्यार्थी परीक्षा केंद्रावरच बसून होते. जनरेटरची व्यवस्था केल्यानंतर विजेची समस्या दूर झाली. मात्र त्यानंतर इंटरनेटच्या समस्येमुळे



विद्यार्थ्यांना परीक्षाच देता येत नव्हती.

आकार कम्युनिकेशन या केंद्रावरील सकाळच्या सत्रातील परीक्षा अखेर रद्द करण्याचा निर्णय राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात आला. या सर्व गोंधळामध्ये परीक्षा केंद्राच्या आत ९ वाजता गेलेले विद्यार्थी २ वाजेपर्यंत आतमध्येच बसून होते. कुर्ला येथील आकार कम्युनिकेशन या परीक्षा केंद्रावर मालाड, भांडुप, मुलुंड, मीरा रोड, भाईंदर या ठिकाणाहून ६२ विद्यार्थी या परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी आले होते. परीक्षेवेळी उडालेल्या या गोंधळामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते.

विद्यार्थ्यांना दुपारी २ वाजता परीक्षा केंद्रातून बाहेर सोडण्यात आले. मात्र केंद्रावर वीज नसल्याने आणि खोल्यांमधील दुरवस्थेमुळे विद्यार्थ्यांना उकाड्याचा सामना करावा लागला होता. परीक्षा केंद्रावरील व्यवस्था चांगली नसल्याबाबत विद्यार्थी व पालकांकडून संताप व्यक्त करण्यात आला. दरम्यान बुधवारी होणारी परीक्षा या केंद्रावर घेण्यात येऊ नये. अन्य केंद्रावर घेण्यात यावी, अशी मागणी पालक व विद्यार्थांकडून करण्यात येत आहे.

# क्लस्टरच्या नावाने ठाणे एक -दोन बिल्डरांच्या घशात घालण्याचे षडयंत्र, राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचे गंभीर आरोप

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

समुह पुनर्विकास (क्लस्टर) योजनेच्या नावाखाली ठाणे शहरातील सर्व 'विकास' एक ते दोन विकासकांच्या घशात घालण्याचे मोठे षडयंत्र रचण्यात आले आहे, असा गंभीर आरोप राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी समाजमाध्यमांद्वारे केले आहेत. तसेच भारतातील श्रीमंतांच्या यादीत पहिल्या शंभरमध्ये असलेल्या दोन कुठल्या तरी बिल्डरला पहिल्या २० मध्ये आणण्यासाठी ठाणे महापालिका मदत करीत आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे.

समुह पुनर्विकास (क्लस्टर) योजनेच्या नावाखाली ठाणे शहरातील सर्व 'विकास' एक ते दोन विकासकांच्या घशात घालण्याचे मोठे षडयंत्र रचण्यात आले आहे. लॅंडबॅंकच्या माध्यमातून बिल्डर्स आपले भांडवली मूल्य (अॅसेट व्हॅल्यू) वाढवितात आणि त्यातून स्वतःच्या धन निर्मितीसाठी त्याचा फायदा करून घेतात. त्यास ठाणे महापालिकेकडून हातभार लावला जात आहे. ठाणे महानगर पालिकेचे जे काम नाही ते काम महानगर पालिका विशेष रूची घेऊन करीत आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे. ठाणे शहरात पाणी नाही, शहरातील कचरा उचलला जात नाही. शहरातील महत्वाचे रस्ते खोदून ठेवले आहेत. अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झाला आहे, याकडे लक्ष देण्याऐवजी म्हाडाच्या जमिनी कशा ताब्यात घ्यायच्या, यासाठी पत्रव्यवहार सुरू आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला आहे. गोरगरीबांनी आपल्या पक्क्या घरांची स्वप्ने, ज्या एसआरएच्या माध्यमातून पाहिली. त्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना (एसआरए) ही गेली अनेक वर्षे कपाटात बंद



करून ठेवली आहे आणि सगळे डोळे फक्त क्लस्टर योजनेकडे लावले आहेत. क्लस्टर का आणि कशासाठी, हा प्रश्न अद्यापही अनुत्तरीत आहे, असेही आव्हाड यांनी म्हटले आहे. दोन कुठल्या तरी बिल्डर्सना, जे भारतातील श्रीमंतांच्या यादीत पहिल्या शंभरमध्ये आहेत. त्या बिल्डर्सला पहिल्या २० मध्ये आणण्यासाठी ठाणे महानगर पालिका त्यांना मदत करीत आहे. ठाणे महानगर पालिकेचे जे काम आहे ते करीतच नाहीत. मात्र गोरगरीबांची घरे उद्ध्वस्त करण्याचे काम अगदी रस घेऊन करीत आहेत. हे करतात कोणासाठी नेमके, कोण आहेत ते बिल्डर्स, ज्यांच्यासाठी हा कट रचला जातोय. ठाण्याच्या मध्यवर्ती भागात सध्या कोणाची कामे चालू आहेत, कोणी मोठ्या – मोठ्या जमिनी विकत घेतल्या आहेत, कितीही लपविण्याचा प्रयत्न केला तरी ते लपणार नाहीच. त्या बिल्डर्सची नावे आज ना उद्या फुटणारच आहेत. मात्र, ठाणेकरांना जे गरजेचे आहे. ते ठाणेकरांना ठाणे महानगर पालिकेने द्यावे. नको त्या धंद्यात पडू नये, असेही आव्हाड यांनी म्हटले आहे. ठाण्यात शिवाईनगर सारखी एक जुनी लोकवस्ती आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर म्हाडा वसाहती आहेत. या म्हाडा वसाहतींमधून वर्षानुवर्ष राहणाऱ्या रहिवाशांना आता पुनर्विकासाचे वेध लागले आहेत. पुनर्विकासासाठी प्रयत्नशील असणाऱ्या लोकांना क्लस्टरचा फास लावण्याचा प्रयत्न पद्धतशीरपणे होत आहे. म्हाडा इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना पुनर्विकासाचा अधिकार नाही का, क्लस्टरचा फास त्यांच्या भोवती कोण आवळत आहे.

# मिरा भाईंदरचे श्वान निर्बीजीकरण केंद्र बंद, भटक्या श्वानांचा उपद्रव वाढण्याची भीती

**■ भाईंदर : आकाश कांबळे**

मिरा भाईंदर महापालिकेचे श्वान निर्बीजीकरण केंद्र मागील काही दिवसापासून बंद असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे निर्बीजीकरण करण्याची प्रक्रिया ठप्प झाली असल्याने शहरात भटक्या श्वानांचा उपद्रव वाढण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.मिरा भाईंदर शहरातील भटक्या श्वानासाठी पालिका प्रशासनाने उत्तन येथे लसीकरण प्रकल्प आणि श्वान निर्बीजीकरण केंद्र उभारले आहे.या केंद्रात दररोज सुमारे तीसहुन अधिक श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केली जाते. शस्त्रक्रिया केल्यानंतर हे श्वान पाच ते सात दिवस केंद्रातच ठेवले जातात व त्यानंतर ते पुन्हा त्यांच्या जागी सोडले जातात.मात्र श्वानाची वाढती संख्या पाहता हे केंद्र आता अपुरे पडू लागले आहे.त्यामुळे ही अडचण दूर करण्यासाठी उत्तन येथे नवे निर्बीजीकरण



केंद्र उभारण्याचा पालिकेमार्फत घेण्यात आला असून त्यासाठी जागेचा शोध सुरु आहे. शहरात श्वानाची संख्या झपाट्याने वाढत असतानाच मागील काही दिवसापासून पालिकेचे श्वान निर्बीजीकरण केंद्र बंद असल्याचे समोर आले आहे. प्रामुख्याने हे केंद्र ठेकेदाराच्या मदतीने चालवले जाते. यात प्रशासन आणि ठेकेदार यांच्यात वाद सुरु असल्यामुळे हे केंद्र बंद ठेवण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.तर पुढील काही दिवस हे केंद्र असेच बंद राहिल्यास शहरात भटक्या श्वानाची समस्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मिरा भाईंदर महापालिकेकडून श्वान निर्बीजीकरण करण्याच्या कामात अधिकाऱ्याच्या संगनमतानी ठेकेदाराकडून करण्यात येणाऱ्या गैर कारभाराची तक्रार युवक कॉंग्रेस चे प्रवक्ते रविंद्र खरात यांनी केली होती.

# उरणच्या नागरी वस्तीतील आरएमसी प्लांटवर कारवाई होणार

**■ उरण : सचिन कदम**

येथील म्हातवली ग्राम पंचायतीच्या हद्दीत आणि उरण ओएनजीसी प्रकल्पा लगत असलेल्या नागरी वस्तीत असलेल्या आरएमसी प्लान्ट क्षेत्र अधिकारी यांच्याकडून तपासणी करून कारवाई करण्याचे संकेत प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिले आहेत. भर नागरी वस्तीत हा प्लान्ट उभारण्यात आला आहे. त्यामुळे या प्लान्टमुळे परिसरात उडणाऱ्या धुळीमुळे नागाव, म्हातवली या दोन्ही ग्रामपंचायतीमधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पर्यावरणाचे नियम धाब्यावर बसवून हजारो नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक बनलेल्या आरएमसी प्लांटवर



कारवाई करण्याची मागणी नागाव-म्हातवली मधील ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. नागाव-म्हातवली ग्रामस्थांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू पाहाणाऱ्या या आरएमसी प्लांट सुरू करण्यासाठी म्हातवली ग्रामपंचायतीने ना-हरकत प्रमाणपत्र दिले असल्याची माहिती म्हातवली ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी ज्योती फोफेरकर यांनी दिली. तसेच येथील विहिरी संदर्भात नागाव आणि म्हातवली या दोन्ही ग्रामपंचायतीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या आरएमसी प्लांटमध्ये दोन व तीन नंबरची खडी, ग्रीटसॅण्ड बनविण्यात येत आहे. खडी,ग्रीटसॅण्ड बनविताना नागाव- म्हातवली ग्रामपंचायतीच्या परिसरात धुळीचे लोट उठतात. परिसरात पसरणारे धुळीचे साम्राज्य आणि कर्णकर्कश आवाजामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. याआधीचा ओएनजीसीच्या प्रकल्पाच्या वाढत्या हवेतील प्रदूषणामुळे याआधीच परिसरातील नागरिक त्रस्त आहेत. त्यामध्ये आता नव्याने सुरू झालेल्या आरएमसी प्लांटची भर पडली आहे.

# कल्याण डोंबिवली पालिकेकडून दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा; पाणी उकळून पिण्याचे पालिकेचे आव्हान

**■ कल्याण : आकाश कांबळे**

कल्याण डोंबिवली पालिकेकडून होणाऱ्या पाणी पुरवठ्याला काही दिवस पिवळसर रंग आणि ते पाणी दुर्गंधी युक्त असण्याची शक्यता आहे. कल्याण डोंबिवली पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने हे पाणी पाहून नागरिकांनी घाबरून जाऊ नये. हे पाणी नागरिकांनी उकळून, गाळून प्यावे, असे आवाहन केले आहे.

कल्याण डोंबिवली शहरांना उल्हास नदीतून पाणी



पुरवठा केला जातो. या नदीला पडलेला जलपर्णीचा विळखा काढण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने शुक्रवारपासून एक यंत्राच्या साहाय्याने उल्हास नदीत सुरूवात केली आहे. जलपर्णीच्या मुळाशी चिखलाचे लगदे आहेत. यांत्रिक सयंत्राच्या साहाय्याने ही जलपर्णी काढताना पाणी अधिक गढुळ होत आहे. जलपर्णीच्या पानांचा पाण्यावरील वेढा यंत्राच्या साहाय्याने काढताना पानगळ, काही पानांचा चुरा होत आहे. या नदी प्रदूषण मुक्त करण्याच्या कामासाठीचे काम करताना उल्हास नदीतून कल्याण, डोंबिवली शहरांना पिवळसर रंगाचा दुर्गंधीयुक्त पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे.

घरातील नळाला पिवळसर रंगाचे दुर्गंधीयुक्त पाणी आले तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये. हे पाणी उल्हास नदीतील जलपर्णी बाहेर काढताना निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे झाले आहे. पालिकेच्या बारावे जलशुध्दीकरण केंद्रात हे पिवळसर दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने या केंद्रातील क्लोरीनची मात्रा प्रमाणात ठेऊन पाणी शुध्द ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घोडे यांनी सांगितले. उल्हास नदीतील जलप्रदूषण विषयावर मागील काही वर्षापासून कल्याणमधील पर्यावरणप्रेमी व मी कल्याणकर संस्थेचे संस्थापक नागरिक नितीन निकम नदीच्या पाण्यात बसून बेमुदत आंदोलन करत आहेत. त्यांना पर्यावरणप्रेमी श्रीनिवास घाणेकर, उमेश बोरगावकर, कैलास शिंदे आणि अनेक पर्यावरणप्रेमी नागरिकांची साथ मिळत आहे. मागील काही दिवसापूर्वी त्यांनी हे आंदोलन केले होते. जोपर्यंत पालिका, शासनाकडून उल्हास नदी शुध्द राहील यासाठी प्रयत्न केले जात नाहीत तोपर्यंत हे आंदोलन सुरू ठेवण्याचा उपोषणकर्ते निकम यांचा प्रयत्न आहे. उल्हास नदी पात्रात विविध शहरांमधून अधिक प्रमाणात प्रदुषित सांडपाणी सोडले जाते. अलीकडच्या काळात या नदीतील जलपर्णीचे प्रमाण वाढत आहे.

# वृक्षांवर रोषणाई करणाऱ्यांविरोधात आता मोहीम

**■ नवी मुंबई : भावना जैन**

शहरात वृक्षांवर खिळे ठोकून रोषणाई केली जाते. त्यामुळे महापालिकेने दंड आकारण्याच्या निर्णयाची सुरुवात केली. बेलापूर सेक्टर ३ येथील एका बार व रेस्टॉरंटवर झाडाला विद्युत रोषणाई केल्याने १० हजार रुपयांचा दंड वसूल केला असून पुढील आठवड्यात शहरात विशेष कारवाई मोहीम महापालिका हाती घेणार आहे.

वृक्षांवर खिळे ठोकणे व विद्युत रोषणाई यामुळे वृक्षांना धोका निर्माण होत असल्याने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षराजीवर परिणाम होऊन पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. म्हणून महापालिकेने नुकसान केल्यास प्रतिझाड १० हजार रुपयांप्रमाणे दंड आकारण्यात येणार असल्याचा निर्णय घेतला होता. पालिका वृक्ष प्राधिकरणाने नुकत्याच झालेल्या ठरावाप्रमाणे शहरातील वृक्षांवर खिळे ठोकणे, विद्युत रोषणाई करणे व वृक्षास इजा पोहचविणाऱ्या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत निर्णय घेतला. त्यानुसार अशा नागरिक, संस्था, व्यावसायिक यांच्याकडून प्रतिवृक्षाप्रमाणे १० हजार



रुपये इतका दंड आकारणेबाबत साहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांच्यामार्फत कारवाई सुरु करण्यात आली आहे.

पालिकेच्या या निर्णयामुळे वृक्षांवर खिळे ठोकणे व विद्युत रोषणाई करून पर्यावरणास बाधक ठरणाऱ्या गैरप्रकारांना आता आळा बसेल तसेच शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या वृक्षांचे व पर्यावरणाचे रक्षण होईल अशी अपेक्षा आहे. यासाठी नागरिकांनी शहराच्या पर्यावरण रक्षण व संवर्धनासाठी पालिकेला सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

शहरात १९७ उद्याने असून २५२ रस्ता दुभाजक, ट्री बेल्ट व मोकळ्या जागा यांचे नैसर्गिक सौंदर्य अधिक वाढवण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे. पालिका जास्तीत जास्त वृक्षलागवडीसाठी प्रयत्न करत असताना दुसरीकडे झाडांवर खिळे ठोकून जाहराती लावणे तसेच विद्युत रोषणाई करणे असे प्रकार वाढत असल्याने पालिकेने कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. बेलापूर ते वाशी दरम्यान सर्व विभागांत मोठ्या प्रमाणात झाडांवर रोषणाई तसेच खिळे ठोकून जाहिराती लावणे असे प्रकार पाहायला मिळत आहेत. या कारवाईचे नागरिक तसेच पर्यावरणप्रेमींकडूनही स्वागत करण्यात येत आहे.

# खारघरच्या दारुमुक्तीसाठी मैदानात 'संघर्ष'; २८ एप्रिलला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**■ पनवेलः सुचिता देशमुख**

राज्य सरकारने खारघर उपनगर हे दारुमुक्त शहर म्हणून घोषित करावे यासाठी नागरिक एकत्र येऊन 'संघर्ष' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून लढा उभारु असा इशारा गुरुवारी पुन्हा एकदा पत्रकार परिषदेतून दिला आहे. २८ एप्रिलला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यानंतर १८ मे रोजी लाक्षणिक उपोषण त्यानंतर ३१ मे आणि १



जून या दोन दिवसात नागरिक उपोषण करणार आहेत.

जानेवारी महिन्यापासून संघर्ष सामाजिक संस्थेने पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन त्यांना याबाबतचे निवेदन दिले होते. या दरम्यान संघर्षने खारघरमधील विविध गृहनिर्माण संस्थांमध्ये जाऊन जनजागृती केली. जनजागृतीनंतर खारघरच्या अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनी खारघर पोलीस ठाण्याच्या प्रभारींना लेखी निवेदन देऊन येथे दारुचे दुकान नको असे कळवले. तब्बल साडेतीन महिन्यानंतर गुरुवारी संघर्ष संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढे दारुमुक्त आंदोलनाची दिशा काय असेल याची माहिती जाहीर केली. संघर्ष संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली की २० वर्षापासून सामाजिक संस्थेचे पदाधिकाऱ्यांनी अलिबाग येथील राज्य उत्पादन शुल्काच्या कार्यालयापर्यंत जाऊन याबाबत वेळोवेळी निवेदने दिल्याने येथे दारु विक्रीची दुकाने आणि बार रेस्ट्रॉरंट सुरू होऊ शकले नाही. सध्या सर्वाधिक विद्यालये, महाविद्यालयांमुळे शैक्षणिक शहर आणि इस्कॉन मंदिरामुळे आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे शहराला अध्यात्मिक शहर अशी ओळख मिळत आहे. अशातच शासनाने चार दारु विक्री व परमीट रुमला परवानगी दिल्यामुळे नागरिक संतापले असून त्यांनी हे आंदोलन हाती घेतले आहे. रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना खारघरवासियांचा दारुमुक्तीचा आवाज ऐकू येण्यासाठी २८ एप्रिलला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यानंतर १८ मे रोजी लाक्षणिक उपोषण त्यानंतर ३१ मे आणि १ जून या दोन दिवसात नागरिक उपोषण करतील असेही संघर्षच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानंतर पावसाळी अधिवेशनादरम्यान मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलनाचे नियोजन करण्यात येईल.

# एपीएमसी पोलिसांवर वाहतूक नियंत्रणाचा ताण

**■ नवी मुंबईः विशेष प्रतिनिधी**

उन्हाळी फळांची आवक मोठ्या प्रमाणात वाढल्याने त्याचा सर्वाधिक ताण एपीएमसी वाहतूक पोलिसांवर पडत आहे. एपीएमसी परिसरात दिवस-रात्र आवक सुरू असल्याने वाहतूक पोलिसांची दमछाक होत आहे. भर उन्हात रस्त्यावर उभे राहून वाहतूक नियंत्रण करावे लागत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून मुंबई कृषी उत्पन्न बाजारपेठेत उन्हाळी फळांची आवक मोठ्या प्रमाणात वाढल्याने एपीएमसी परिसरात वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत होती. मात्र व्यवस्थित नियोजन आणि वाढीव बंदोबस्ताची साथ मिळाल्याने वाहतूक सुरळीत होत आहे. फेब्रुवारीच्या शेवटी कलिंगड, अननस, खरबूज या फळांची आवक मोठ्या प्रमाणात झाल्याने वाहतुकीवर ताण पडला आहे. त्यात आता आंब्याची भर पडली आहे. एपीएमसी बाजारात दोनशे ते तीनशे ट्रक वाढल्याने परिसरात दुतर्फा पार्किंग करावी लागत आहे. या सर्वांचा ताण वाहतुकीवर पडला आहे. त्यात रात्रभर कृषी मालाची आवक आणि दिवसभर माल उतरवणे, चढवणे तसेच अन्य वाहतूक असल्याने वाहतूक पोलिसांवर वाहतूक नियंत्रणाचा ताण पडत होता. त्यात ऊन कडक वाढल्याने अनेकांना त्रासही सुरू झाला होता. यावर उपाययोजना करताना मुख्यालयाकडून



अतिरिक्त मनुष्यबळ मिळाल्याने थोडा भार हलका झाला आहे. त्यामुळे आता थेट रस्त्यावर उभे राहून वाहतूक नियंत्रित केली जात आहे. वाहतूक नियंत्रणाचा सार्वधिक ताण हा तुर्भे स्मशानभूमी चौक, माथाडी चौक, सानपाडा चौक या ठिकाणी आहे. याशिवाय एपीएमसी आवारात बेकायदा पार्किंग करणाऱ्यांवर नजर ठेवावी लागते. त्यात मनुष्यबळ केवळ ३१ आहे. बीट चौकीत कायम तीन ते चार जण असतात. सुट्टीवर किमान पाच जण असतात. त्यामुळे प्रत्यक्षात २० /२१ कर्मचाऱ्यांवर काम भागवावे लागते. त्यात या ठिकाणी रात्रभर आणि दिवसाही मनुष्यबळ लागत असल्याने अतिरिक्त ताण पडतो. ही परिस्थिती ओळखून मागील आठवड्यात अतिरिक्त चार जणांची नेमणूक करण्यात आली आहे.

# वसई विरारमध्ये अग्निशमन दलातर्फे अग्निसुरक्षाविषयी जनजागृती, आग दुर्घटना रोखण्यासाठी प्रयत्न

**■ वसई : सुचिता देशमुख**

वसई विरार मध्ये शॉट सर्किट यासह विविध प्रकारच्या कारणांमुळे आगी लागल्याच्या घटना घडतात. आगी लागल्यानंतर सावधानता बाळगून करावयाच्या उपाय योजना याबाबत पालिकेच्या अग्निशमन दलातर्फे अग्निसुरक्षेविषयी माहिती देऊन जनजागृती करण्यात येत आहे.

वसई विरार अग्निशमन दलाच्या वतीने वसई विरार शहरात अग्नी विषयक जनजागृती करण्यासाठी १४ ते २० एप्रिल दरम्यान हा सुरक्षा सप्ताह घेण्यात आला. यात अग्निशमन दलाच्या अधिकारी यांच्या उपस्थितीत अग्निशमन दलाच्या ध्वजाला मानवंदना देत जनजागृतीपर उपक्रमाची सुरुवात करण्यात आली होती. यात पालिकेच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी गृह संकुले, मॉल, शोरूम, व्यापारी बाजारपेठा,शाळा- महाविद्यालये औद्योगिक कारखाने यासह अन्य विविध ठिकाणच्या भागात मॉक ड्रिल, प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले. रविवारी शहरात आगीच्या



दुर्घटना घडू नये यासाठी पालिका क्षेत्रातील विभागात अग्निशमन दलाच्या वाहनांचा ताफा घेऊन जनजागृती रॅली काढण्यात आली होती. यात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, उपायुक्त सदानंद पुरव, शहरअभियंता प्रदीप पाचंगे, अग्निशमन दल प्रमुख दिलीप व अग्निशमन दलाचे जवान उपस्थित होते. यावेळी साहित्य प्रदर्शन, अग्निसुरक्षा विषयक मार्गदर्शन असे उपक्रम राबविण्यात आले असल्याचे अग्निशमन दलप्रमुख दिलीप पालव यांनी सांगितले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेविषयी सक्षमता, आगीच्या घटना घडू नये यासाठी घ्यावयाची काळजी, तसेच अग्निशमन दलाच्या जवानांना देखील यातून प्रोत्साहन मिळावे यासाठी या सप्ताह आयोजित करण्यात आला असून नागरिकांनी अग्निसुरक्षा व इतर आपत्कालीन परिस्थितीत सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शहरात घडणाऱ्या आग दुर्घटना व आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी पालिकेच्या ताब्यात विविध प्रकारची अत्याधुनिक यंत्रणा दाखल झाली आहे.

# अखेर उल्हास नदीतील जलपर्णी हटवण्याचे काम सुरू

**■ उल्हासनगः सतिश सोनावणे**

प्रदूषणामुळे उल्हास नदीत तयार झालेल्या जलपर्णी आच्छादनाला हटवण्यास शुक्रवारपासून सुरुवात झाली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून जलपर्णी हटवण्यासाठी यंत्र आणण्यात आले आहे. या यंत्राने शुक्रवारपासून कामाला सुरुवात केली गेल्या अनेक दिवसांपासून या यंत्राची प्रतिक्षा होती.नागरी सांडपाण्यामुळे उल्हास नदीत दरवर्षी मोठ्या प्रमाणावर जलपर्णी निर्माण होते. या जलपर्णीमुळे पाणी पातळी वेगाने कमी होते. तर ही जलपर्णी पाणी उचल केंद्रांमध्ये शिरल्याने केंद्रामध्ये बिघाड होतो. परिणामी पाणीपुरवठ्यावर परिणाम होतो. नागरी आणि औद्योगिक सांडपाणी हे प्रदूषणासाठी डोकेदुखी ठरू लागले आहे. यावर अनेक प्रयत्न केले तरी नियंत्रण मिळवणे




अजूनही शक्य झालेले नाही. परिणामी उल्हास नदीला जलपर्णीचा वेढा पडतोच आहे.

उल्हास नदीतील या जलपर्णी हटवण्यासाठी सामाजिक संघटना आणि पर्यावरण प्रेमींनी आंदोलन केले होते. याची दखल घेत राज्याचे अप्पर मुख्य सचिव असीम गुप्ता यांनी एमएमआरडीए मुख्यालयात विशेष बैठक बोलावत जलपर्णीवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले. २८ मार्च रोजी झालेल्या या **बैठकीत जलपर्णी काढण्यासाठी पंधरा दिवसात यंत्र उपलब्ध करून दिले जाईल आणि या यंत्रांची संख्या १० पर्यंत वाढवली जाईल असे ठरवण्यात आले होते. मात्र ही यंत्रे पंधरा दिवसात उपलब्ध होऊ शकली नाहीत. अखेर शुक्रवारी उल्हास नदीपात्रात हे यंत्र उतरवण्यात आले. या यंत्राच्या मदतीने जलपर्णी काढण्यास सुरुवात करण्यात आली. उल्हास नदीतून काढला** जाणाऱ्या जलपर्णीला सुकवून त्यापासून विविध गृहपयोगी वस्तू तयार केल्या जाणार आहेत. यासाठी जिल्हा परिषद महिला बचत गटांना प्रशिक्षण देत आहे. जलपर्णीचा कचरा फेकला जाणार नाही तर त्यापासून पुनर्निर्मिती केली जाणार आहे. यातून महिलांना रोजगार उपलब्ध होणार असून त्यांना चांगला मोबदलाही मिळणार आहे.

# २००८ मालेगाव बॉम्बस्फोट खटला : १७ वर्षांच्या सुनावणीनंतर निकाल राखीव, 'या' दिवशी निकाल देण्याची शक्यता

**■ मुंबई : मेहुल गायकवाड**

मालेगाव येथे २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांशी संबंधित खटल्याची सुनावणी १७ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर शनिवारी पूर्ण झाली. त्यानंतर, विशेष न्यायालयाने खटल्याचा निकाल राखून ठेवला व प्रकरणाची सुनावणी ८ मेपर्यंत स्थगित केली. त्यामुळे, विशेष न्यायालय ८ मे रोजी खटल्याचा निकाल देण्याची शक्यता आहे.

लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित आणि माजी भाजप खासदार प्रज्ञा ठाकूर यांच्यासह मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त), अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांच्यावर खटला चालविण्यात आला. खटल्यात सरकारी वकिलांनी ३२३ साक्षीदारांचे साक्षीपुरावे नोंदवले असून त्यापैकी ३४ साक्षीदार फितूर झाले. शिवाय. गेल्या १७ वर्षांचा अतिरिक्त न्यायाधीश लाहोटी हे खटल्याचे कामकाज पाहणारे पाचवे न्यायाधीश आहेत.

राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) कायद्यांतर्गत स्थापन विशेष न्यायालयात शनिवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी विशेष सरकारी वकिलांनी विविध निवाड्यांचा दाखला देणारा लेखी स्वरूपातील अंतिम युक्तिवाद न्यायालयात सादर केला. त्यानंतर, विशेष एनआयए न्यायालयाचे न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी खटल्याची सुनावणी पूर्ण झाल्याचे आणि निकाल राखून ठेवत असल्याचे जाहीर केले. तसेच, प्रकरणाची सुनावणी ८ मे रोजी निकालासाठी ठेवण्यात येत असल्याचेही नमूद केले.

दरम्यान, खटल्याचे कामकाज पाहणारे अतिरिक्त सत्र न्यायाधीश लाहोटी यांच्या नियोजित



बदलीचा निर्णय उच्च न्यायालय महानिबंधकांनी गुरूवारीच ३१ ऑगस्टपर्यंत स्थगित केला होता. खटल्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. तसेच, अतिरिक्त सत्र न्यायाधीश लाहोटी यांनी खटल्याचे जवळपास संपूर्ण कामकाज पाहिले आहे आणि युक्तिवाद ऐकला आहे. खटल्यात आतापर्यंत नोंदवण्यात आलेल्या साक्षीपुराव्यांवर सरकारी आणि बचाव पक्षाचा सध्या अंतिम युक्तिवाद सुरू आहे. त्यामुळे, खटल्याच्या या टप्प्यावर अतिरिक्त सत्र न्यायाधीश लाहोटी यांची तूर्त बदली केली जाऊ नये. त्यांच्या नियोजित बदलीला मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती प्रकरणातील पीडिताने उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना पत्राद्वारे केली होती. त्यानंतर, उच्च न्यायालय प्रशासनाने अतिरिक्त सत्र न्यायाधीश लाहोटी यांच्या बदलीचा निर्णय स्थगित केला होता. मुंबईपासून सुमारे २०० किमी अंतरावर असलेल्या मालेगाव येथील मशिदीजवळ २९ सप्टेंबर २००८ रोजी मोटारसायकलचा स्फोट होऊन सहा जण ठार आणि १०० हून अधिक जखमी झाले होते. सुरूवातीला राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) या प्रकरणाचा तपास केला होता. त्यानंतर, प्रकरणाचा तपास एनआयएकडे वर्ग केला गेला. प्रकरणाच्या तपासाची सूत्रे घेतल्यानंतर एनआयएने २०१६ मध्ये पुरवणी आरोपपत्र दाखल केले होते. त्यात, साध्वी यांच्यासह श्याम साहू, प्रवीण टाकळकी आणि शिवनारायण कलसंग्रा यांच्याविरोधात पुरावे नसल्याचा दावा करून त्यांना दोषमुक्त करण्याचे म्हटले होते.

# कर्नाक रेल्वे उड्डाणपूल लवकरच मुंबईकरांच्या सेवेत, १० जूनपर्यंत वाहतुकीस खुला करण्याचे निर्देश

**■ मुंबई : प्रथमेश चव्हाण**

मशीद बंदर रेल्वे स्थानकापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या आणि पी. डि'मेलो मार्गाला जोडणाऱ्या कर्नाक रेल्वे उड्डाणपुलाचे काम १० जून २०२५ पर्यंत पूर्ण करावे आणि हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. निश्चित केलेल्या कालमर्यादेत म्हणजेच पुढील ५३ दिवसांत पुलाची सर्व कामे पूर्ण करावीत. कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी सक्त ताकीद अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी यांनी कंत्राटदार आणि स्थानिक अधिकाऱ्यांना दिली. अभिजीत बांगर यांनी १८ एप्रिल २०२५ रोजी प्रकल्पस्थळास भेट देऊन उड्डाणपुलाच्या कामाचा आढावा घेतला. तसेच आवश्यक ते निर्देश दिले. प्रमुख अभियंता (पूल) उत्तम श्रोते, उपप्रमुख अभियंता (शहर) राजेश मुळे यांच्यासह संबंधित अधिकारी, अभियंते उपस्थित होते.

दक्षिण मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मशीद बंदर आणि मोहम्मद अली मार्ग परिसरातील वाहतुकीसाठी कर्नाक पूल महत्त्वाचा आहे. लोकमान्य टिळक मार्गावरील धोकादायक बनलेल्या कर्नाक पुलाच्या पुनर्बांधणीचे काम मुंबई महानगरपालिकेने हाती घेतले आहे. रेल्वे मार्गावर तुळई स्थापित करण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पुढील कामकाजाचे सूक्ष्म नियोजन करून



टप्पानिहाय किती कालावधी लागेल, याची निश्चिती महानगरपालिकेच्या पूल विभागामार्फत करण्यात आली आहे. त्यानुसार, पूर्व आणि पश्चिम दिशेचे काम प्रगतिपथावर आहे. कर्नाक उड्डाणपूल १० जून २०२५ पर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे पुढील ५३ दिवसांमध्ये उर्वरित सर्व कामे पूर्ण होतील यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. पुलाच्या पश्चिम दिशेकडील कामे आटोक्यात आली आहेत. मात्र, पूर्व दिशेकडील कामांची गती वाढवणे आवश्यक आहे. पूर्व दिशेला ८ खांब पूर्ण झाले असून आधारभूत संरचना (पेडेस्टल) स्तरावर काम सुरू आहे. ४० पैकी ५ लोखंडी तुळया (गर्डर) प्रकल्पस्थळी आल्या आहेत. यापुढील काळात पेडेस्टल आणि बेअरिंगचे काम समांतरपणे करावे, असे निर्देश बांगर यांनी दिले.

# हे राज्य कायद्याचे की बळाचे? उच्च न्यायालयाचा उद्विग्न सवाल, 'सिडको'ची खरडपट्टी

**■ मुंबई : विशाल कारंडे**

नवी मुंबईतील एका भूखंडावरील बेकायदेशीर बांधकामे हटविण्यात अपयशी ठरल्याबद्दल शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाला (सिडको) मुंबई उच्च न्यायालयाने फटकारले. कारवाईसाठी गेलेल्या 'सिडको'च्या अधिकाऱ्यांना सरपंचाने धमकावल्याची दखल घेत हे कायद्याचे राज्य आहे की बळाचे, असा उद्विग्न सवाल न्यायालयाने केला.



दीपक पाटील यांनी २०१६ मध्ये याचिका करून आपल्या जमिनीवरील अनधिकृत बांधकामे पाडण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली होती. त्यावर झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने 'सिडको'चे अधिकारी कठोर कारवाई करण्यास इच्छुक नाहीत, असे ताशेरे ओढले. कायदेशीर कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांना बोकडविरा गावच्या सरपंचाने धमकावल्याचे सिडकोच्या वतीने सांगण्यात आले. त्यावर अधिकाऱ्यांना पुरेसे पोलीस संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे आणि बेकायदेशीर कृत्यांना रोखणे व कायद्याचे राज्य स्थापित करणे हे अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे, असे न्यायालयाने बजावले. बांधकामे एका आठवड्याच्या आत हटविण्यासाठी आवश्यक कायदेशीर उपाय करा, असे आदेश न्यायालयाने सिडकोला दिले. सिडकोने २०२२ मध्ये सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची खंडपीठाने दखल घेतली. त्यात, याचिकाकर्त्याच्या जमिनीवरील बांधकामे बेकायदा असल्याचे निष्पन्न झाल्याचे म्हटले होते. असे असूनही गेल्या दहा वर्षांत बेकायदा बांधकामांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सिडकोतर्फे कोणतेही प्रयत्न केले गेले नसल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले.

# आयआयटी मुंबईच्या 'हब'अंतर्गत मुंबई विद्यापीठाचा समावेश, प्रगत आणि उद्योन्मुख क्षेत्रात संशोधन होणार

**■ मुंबई : सम्यक कासारे**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशनद्वारे (एएनआरएफ) सुरू करण्यात आलेल्या 'पार्टनरशिप्स फॉर एक्सिलरेटेड इनोव्हेशन अँड रिसर्च' (पीएआयआर) उपक्रमाअंतर्गत मुंबई विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे. आयआयटी मुंबईच्या 'हब' अंतर्गत मुंबई विद्यापीठ 'स्पोक' म्हणून काम करणार आहे. यामुळे मुंबई




विद्यापीठाच्या संशोधनाचे क्षितिज विस्तारणार आहे.

देशभरातील निवडक सात 'हब' संस्थांमध्ये आयआयटी मुंबईची निवड झाली असून या 'हब' संस्थेशी संलग्न असलेल्या 'स्पोक' संस्थांमध्ये मुंबई विद्यापीठाचा समावेश आहे. या भागिदारीमुळे मुंबई विद्यापीठाला आयआयटी मुंबईसारख्या उच्च-स्तरीय संस्थेच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा लाभ मिळणार असून विद्यापीठातील संशोधनाला नवी दिशा आणि गती मिळणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत मुंबई विद्यापीठातील प्राध्यापक आणि संशोधकांना 'इंडस्ट्री ४.०', 'ॲडव्हान्स मटेरियल्स' आणि 'ग्रीन एनर्जी व सस्टेनेबिलिटी' यांसारख्या क्षेत्रांमध्ये एकत्रितपणे संशोधन करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या नेटवर्कसाठी पुढील पाच वर्षांसाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. या मोठ्या आर्थिक पाठबळामुळे दोन्ही संस्थांना अत्याधुनिक संशोधन सुविधा विकसित करणे, उच्च दर्जाचे संशोधन करणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभाव टाकणारे निष्कर्ष प्राप्त करणे शक्य होणार आहे. तसेच ज्ञान आणि कौशल्याची देवाणघेवाण, आधुनिक संशोधन सुविधा, उपकरणे आणि पायाभूत सुविधा, आंतर-संस्थात्मक सहकार्य, विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या संशोधनात सहभागी होण्याची आणि प्रख्यात प्राध्यापकांकडून मार्गदर्शन मिळवण्याची संधी मिळणार आहे. तर मुंबई विद्यापीठात एक उत्कृष्ट संशोधन संस्कृती विकसित होणार आहे. तसेच विद्यापीठाच्या संशोधन क्षेत्रातच नव्हे, तर उच्च शिक्षण क्षेत्रातही एक सकारात्मक बदल घडेल, असे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

# कुठल्याही भूखंडावर पुनर्विकासाचा 'म्हाडा'ला अधिकार! सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण

**■ मुंबई : नितीन देवळेकर**

खासगी वा अन्य कुठलाही भूखंड असला तरी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला (म्हाडा) समूह पुनर्विकास करण्याचा अधिकार विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतच देण्यात आला आहे. भूखंड मालक किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेला सोबत घेऊन पुनर्विकास करता येऊ शकतो, असे निरीक्षण शीव येथील सिंधी निर्वासितांच्या पंजाबी वसाहतीच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा करताना सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. या निकालाचा भविष्यात फायदा होणार असल्याची प्रतिक्रिया म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्याने व्यक्त केली. गुरु तेग बहादूर नगर येथील सिंधी निर्वासितांच्या पंजाबी वसाहतीचा पुनर्विकास करण्यासाठी मे. लखानी हौसिंग कॉर्पोरेशनची रहिवाशांनी नियुक्ती केली होती. परंतु हा प्रकल्प रखडला होता. सुमारे ११.२० एकर भूखंडावरील २५ इमारती मोडकळीस आल्यामुळे २०१९ मध्ये पाडण्यात आल्या. परंतु त्यानंतर आता पाच वर्षे होत आली तरी या वसाहतीचा पुनर्विकास होऊ शकला नव्हता. त्यामुळे रहिवाशांनी म्हाडाला विनंती केली. म्हाडाने गोरेगाव येथील मोतीलाल नगरच्या धर्तीवर 'कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सी'मार्फत पुनर्विकास करण्याचे ठरविले. त्यानुसार प्रस्ताव तयार केला व राज्य शासनाच्या मंजुरीसाठी पाठविला. राज्य मंत्रिमंडळाने या प्रस्तावास मंजुरी दिल्यानंतर म्हाडाने ई-निविदा काढल्या. या निविदांना दोन विकासकांनी प्रतिसादही दिला. परंतु लखानी हौसिंग कॉर्पोरेशनने उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. परंतु सर्वोच्च न्यायालयानेही याचिका निकाल काढली. त्यामुळे आता म्हाडाचा पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. सदर भूखंड खासगी असल्यामुळे म्हाडाला समूह पुनर्विकास करता येत नाही, असा दावा या याचिकेत करण्यात आला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाने हा मुद्दा खोडून काढताना म्हाडाला असा पुनर्विकास करता येतो, असे स्पष्ट केले. त्यामुळे म्हाडाला दिलासा मिळाला असला तरी अशा पद्धतीच्या भविष्यातील समूह पुनर्विकासात फायदा होईल, अशी आशा आता म्हाडाला वाटत आहे. पंजाबी वसाहतीतील रहिवाशांसोबत नोंदणीकृत करारनामा झालेला नसतानाही संबंधित विकासक पुनर्विकासासाठी काढण्यात आलेल्या ई-निविदांना आक्षेप घेऊ शकत नाही. जरी अशा प्रकारचा करारनामा अस्तित्वात असला तरी त्यानुसार विकासकाने बांधकाम पूर्ण केलेले नाही.

# नागपूर, पुणे, नाशिक, छ. संभाजी नगर प्राधिकरणाप्रमाणेच शासकीय जमिनी वर्ग करा, एमएमआरडीए आणि एमएसआरडीसीची मागणी

**■ मुंबई : गणेश बागडे**

नागपूर, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अर्थात पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधीची उभारणी करण्याकरीता त्या त्या प्राधिकरणाच्या हद्दीतील शासकीय जमिनी प्राधिकरणांकडे वर्ग करण्याचा निर्णय राज्य सरकारने गेल्या आठवड्यात राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला. या पार्श्वभूमीवर आता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळानेही (एमएसआरडीसी) आपल्या हद्दीतील शासकीय जमिनी आपल्याकडे वर्ग कराव्यात अशी मागणी राज्य सरकारकडे केली आहे. एमएमआरडीए मुंबई महानगर प्रदेशात मेट्रो, दुहेरी बोगदे, सागरी सेतूसह अनेक प्रकल्प राबवित आहे. या प्रकल्पांसाठी एमएमआरडीएने अडीच लाख कोटी रुपयांची उभारणी स्वनिधीद्वारे करायची आहे. तर एमएसआरडीसी राज्यभरात ४२१७ किमी लांबीच्या रस्त्यांचे जाळे विणत असून यासाठीही कोट्यवधींच्या निधीची आवश्यकता आहे. उत्पन्नाचा मोठा स्रोत नसल्याने एमएमआरडीए आणि एमएसआरडीसीने जमिनी वर्ग करण्याची मागणी केली आहे.

मागील काही वर्षांत एमएमआरडीएच्या प्रकल्पांची संख्या प्रचंड वाढली आहे. मात्र एमएमआरडीएच्या तिजोरीत खडखडाट आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चाच्या प्रकल्पांसाठी कर्ज, कर्जरोखे यातून निधीची उभारणी करण्यात येत आहे. आतापर्यंत एमएमआरडीएने साडेसात लाख कोटी रुपये कर्ज रुपाने उभारण्यात आले आहेत. एमएमआरडीएला स्वनिधीतून अडीच लाख कोटी रुपये निधी उभा करायचा आहे. यासाठी एमएमआरडीए बीकेसीतील भूखंडांचा ई – लिलाव करीत आहे. मात्र यातून काही हजार कोटी उभारले जातील. त्यामुळे उर्वरित निधी कसा उभारायचा असा प्रश्न एमएमआरडीएसमोर आहे. अमुंबई महानगरपालिकेकडील थकबाकीही एमएमआरडीएला मिळालेली नाही. या पार्श्वभूमीवर वर्षभरापूर्वी एमएमआरडीएने आपल्या हद्दीतील शासकीय जमिनी वर्ग कराव्यात आणि या जमिनीच्या विकासातून निधी उभारता येईल अशी संकल्पना सरकारसमोर मांडली होती. सरकारने यावर विचार केला, त्यानुसार ८ एप्रिल रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारने एमएमआरडीए वगळून पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांना त्यांच्या हद्दीतील जमिनी त्यांना वर्ग करण्याचा निर्णय घेतला. ही संकल्पना मांडणाऱ्या आणि सर्वाधिक निधीची गरज असलेल्या एमएमआरडीएला वगळण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. सरकारी जमिनींवर अतिक्रमण होऊ न देता जमिनीचे संरक्षण करून त्यांच्या विकासातून निधी उभारल्यास त्याचा भार सरकारच्या तिजोरीवर पडणार नाही, असा मुद्दा उपस्थित करीत एमएमआरडीएने आपल्या हद्दीतील जमिनी वर्ग करण्यासाठी आग्रही असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# राज- उद्धव एकीकरणाला दुसऱ्या फळीचा विरोध; संजय राऊत, संदीप देशपांडे यांच्यात आरोपप्रत्यारोप

**■ मुंबई : प्रथमेश चव्हाण**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मनसे प्रमुख राज ठाकरे हे दोघे भाऊ महाराष्ट्र हितासाठी टाळी देणार अशी चर्चा सुरू झाली असताना या दोन्ही पक्षातील दुसऱ्या फळीतील नेत्यांमध्ये वाक्युद्ध रंगले आहे.

महाराष्ट्रद्रोही कोण हे जर राज ठाकरे यांना कळणार नसेल, तर त्यांच्यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरू करावा लागेल, असा टोला ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे. तर मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी जुना वाद उकरून काढत मशिदींवरील भोंग्यांच्या विरोधातील आंदोलनात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात मनसे कार्यकर्त्यांवर दाखल केलेल्या १७ हजार गुन्ह्यांबद्दल उद्धव ठाकरे माफी मागणार का, असा सवाल केला आहे.

महाराष्ट्र हित आणि मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी आमच्यातील भांडणे क्षुल्लक आहेत, असे सांगून राज ठाकरे यांनी दोन्ही भाऊ एकत्र येण्यास हरकत नसल्याचे सूतोवाच केले. त्याला उद्धव ठाकरे यांनी प्रतिसाद



देताना भाजप किंवा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर तडजोडी चालणार नाहीत, अशी अटही घातली होती. महाराष्ट्र हितासाठी एकत्र येण्याची भाषा दोन भाऊ करीत असताना त्यांचे नेते मात्र एकमेकांमध्ये भांडत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, दोन नेत्यांच्या एकीकरणावर दुसऱ्या फळीतील नेते टिप्पणी करून वातावरण कलुषित करीत असल्याचे दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

# मधमाशाअभावी फळधारणा घटली: डाळिंब, मोसंबी, टरबूज, शेवगा उत्पादनात घट



**■ मुंबई : सम्यक कासारे**

मधमाशा पृथ्वीवरून नष्ट झाल्या तर मानव फक्त चारच वर्षे जगू शकेल, असे थोर शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईने म्हटले होते. त्याची प्रचिती येऊ लागली आहे. मधमाशांअभावी डाळिंब, मोसमी आणि शेवगा उत्पादनात मोठी घट झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतात कृत्रिम मधपेट्या ठेवाव्या लागत आहेत. रसायनांचा अतिरेकी वापर थांबला नाहीतर अन्नधान्य, फळे, भाजीपाला उत्पादनात मोठी घट होण्याची भीती आहे.

जगभरात जास्तीत – जास्त कृषी उत्पादनासाठी संकरीत बियाणे, कीडनाशके आणि रसायनांचा अतिरेकी वापर सुरू आहे. त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. राज्यात यंदा प्रथमच डाळिंबाला मोठा फटका बसला असून, उत्पादनात ५० टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. डाळिंब उत्पादकांना कृत्रिम मधपोट्यांची गरज भासत आहे. डाळिंबाला प्रति एकर एक ते पाच मधपेट्या ठेवाव्या लागत आहेत. डाळिंबाच्या बागेत परागीभवनासाठी म्हणजे फुलांपासून फळधारणा होण्याची प्रक्रिया होण्याठी मधमाशांना पर्याय नाही. पण, डाळिंब पिकावरील कीड, कीटक आणि बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अतिरेकी कीडनाशकांची फवारणी केली जाते. त्यामुळे डाळिंब बागेत रसायनांचा वास भरून राहतो किंवा मधमाशांना हानिकारक ठरणारा वायू तयार होतो. त्यामुळे मधमाशा डाळिंबाच्या बागेत येत नाहीत. त्यामुळे शेतकरी कळी, फुलोरा असतानाच्या काळात कीडनाशकांची फवारणी टाळत आहेत. मधमाशांना आकर्षिक करण्यासाठी गूळ आणि ताकाच्या मिश्रणाची फवारणी करीत आहेत, अशी माहिती पैठण येथील प्रयोगशील शेतकरी यज्ञनेश कातबने यांनी दिली.

सांगोला डाळिंब उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. येथील तरुण शेतकरी दत्तात्रय येलपले म्हणाले, प्रति एकर बारा ते तेरा टन डाळिंब उत्पादन होत होते. गत काही वर्षांपासून मधमाशाअभावी अपेक्षित फळधारणा होत नसल्यामुळे प्रति एकर उत्पादन सात ते आठ टनांवर आले आहे. दरवर्षी फुलोऱ्याच्या काळात भाड्याने मधपेट्या ठेवाव्या लागत आहेत. तरीही अपेक्षित फळधारणा होताना दिसत नाही. त्यामुळे मधमाशांना अपाय होणाऱ्या कीडनाशकांची फवारणी न करणे, बांधांवर फळे, फुलांची लागवड करणे, जैविक खते, कीडनाशकांची फवारणी करणे, अशी उपाययोजना करावी लागत आहे.

गत काही वर्षांपासून डाळिंब, मोसमी, टरबूज, खरबूज आणि शेवगा पिकांचे उत्पादन मधमाशांअभावी अडचणीत आले आहे. डाळिंबाच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे.

# मुलुंडमधील पक्षी उद्यानासाठी आरक्षण बदलाची प्रक्रिया पूर्ण, राज्य सरकारची मंजुरी

**■ मुंबई : नितीन देवळेकर**

मुंबई महापालिकेतर्फे पूर्व उपनगरातील मुलुंड येथे लवकरच एक पक्षीगृह उभारण्यात येणार असून त्याकरिता आरक्षण बदलाच्या प्रस्तावास नुकतीच राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. मुलुंडच्या या नियोजित उद्यानात १८ दुर्मीळ प्रजातींसह २०६ प्रजातींचे पक्षी ठेवण्यात येणार असून या पक्षी उद्यानाच्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. मुलुंड पश्चिमेकडे नाहूर गाव परिसरात सीटीएस क्रमांक ७०६ हा भूखंड पालिकेने उद्यान व वाहनतळ या उद्देशासाठी आरक्षित आहे. या आरक्षित भूखंडाचा विकास करण्यात येणार असून तेथे सर्व सुविधांनी युक्त असे उद्यान तयार करण्यात येणार आहे. तसेच उद्यानात पक्षीगृह तयार करण्यात येणार आहे.मुंबई प्राणीसंग्रहालयाच्या संचालकांनी जानेवारी २०२४ मध्ये



नाहूर भूखंडाचे आरक्षण बदलण्यासाठी प्रस्ताव पाठवला होता. महापालिकेने त्यावर सूचना हरकतींची प्रक्रिया सप्टेंबरमध्ये पूर्ण केली. जानेवारी २०२५ मध्ये नगरविकास विभागाला प्रस्ताव सादर केला. नगर विकास विभागाने मुंबई महापालिकेने पाठवलेल्या प्रस्तावास नुकतीच मंजुरी मिळाली. असल्याची माहिती मुलुंडचे भाजप आमदार मिहीर कोटेचा यांनी दिली.

नगररचना संचालकांनी फेब्रुवारीमध्ये यासंदर्भातला अहवाल दिला असून ७ एप्रिल रोजी नगरविकास विभागाने भूखंडाच्या आरक्षण फेरबदल्यास मंजुरी दिल्याची अधिसूचना जारी केली आहे, असे आमदार कोटेचा यांनी सांगितले.नाहूर येथील सीटी सर्वे क्रमांक ७०६, ७१०, ७१२, ७६२, ७६३ या उद्यान व प्राणीसंग्रहालयासाठी राखीव असलेल्या भूखंडातील १७९५८ चौ. मी. क्षेत्रफळ पक्षी उद्यानासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. प्रस्तावित मुलुंड पक्षी उद्यान हे वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणीसंग्रहालयाचे (भायखळा) उपकेंद्र असणार आहे. या पक्षी उद्यानात आशियाई, आफ्रिकी, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकी पक्षांची विभागणी असणार आहे. प्रत्येक पक्ष्यांच्या प्रजातींचे निवासस्थान उभारण्यात येणार आहे. रेड ब्रेस्टेड पॅराकीट, ब्लॉसम हेडेड पॅराकीट, पांढरा मोर, मलबार ग्रे धनेश, काळा हंस, ब्रुक मुनिया, कोकाटू गालाह, शहामृग, स्कॉलेट या काळाच्या ओघात लुप्त होत चाललेल्या दुर्मीळ १८ प्रजातींचे २०६ पक्षी येथे पाहता येणार आहेत.

# अंबरनाथमध्ये रासायनिक कंपनीला आग, आगीवेळी स्फोट, जिवीतहानी नाही

**■ अंबरनाथ : सतिश सोनावणे**

अंबरनाथच्या मोरीवली औद्योगिक वसाहतीतील एका रासायनिक कंपनीला शनिवारी सायंकाळच्या सुमारास आग लागली. सुरुवातीला कंपनीत काही स्फोट झाले, त्यानंतर ही भीषण आग लागली. स्पीड इंटरनॅशनल इंडिया प्रा. लि. असे या रासायनिक कंपनीचे नाव आहे. यावेळी स्फोटामुळे आसपासचा परिसरात हादरे जाणवले सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही.

अंबरनाथ पश्चिम येथील मोरिवली औद्योगिक वसाहतीत स्पीड इंटरनॅशनल इंडिया प्रा. लि. ही कंपनी असून यात पोटॅशियम परमॅग्नेट, सोडियम




परमॅग्नेट आणि बोरीक ॲसिड पावडर तयार केली जाते. या कंपनीत शनिवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास अचानक स्फोट होऊन भीषण आग लागली. रासायनिक कंपनी असल्याने आग लागल्यानंतर अनेक स्फोट झाले. यामुळे आसपासच्या परिसरात भीतीचे वातावरण होते. अंबरनाथसह उल्हासनगर आणि बदलापूर नगरपालिकेच्या अग्निशमन पथकांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. या आगीत कंपनीचे मोठे नुकसान झाले. कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती अग्निशमन अधिकारी सोनोने यांनी दिली आहे.

# राजस्थानचे प्रदूषित रसायन, अवैध विल्हेवाटीसाठी तळोजातील बंद कंपनीत

**■ पनवेल : सतिश सोनावणे**

तळोजातील निडीलॅक्स फाईन केम कंपनीत बुधारी सायंकाळी राजस्थान येथून अवैधरित्या विल्हेवाटीसाठी टॅंकरमधून रसायन आणण्यात आले. निडीलॅक्स हा कारखाना अनेक महिने बंद आहे. बंद कारखान्यामधील तळोजा सामाईक रासायनिक सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पाच्या (सीईटीपी) वाहिनीमध्ये हे घातक रसायन विना प्रक्रिया थेट रिता करताना तळोजा पोलिसांनी रंगेहाथ पकडले. वरिष्ठ पोलीस निरिक्षक प्रविण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पोलीस उपनिरिक्षक ज्ञानेश्वर धुळगंडे यांनी केली. या प्रकरणी सध्या टॅंकरचालक व कंपनीच्या रखवालदारासह कंपनीच्या मालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तळोजातील



रासायनिक प्रकल्प चालविणाऱ्या कारखानदारांवर प्रदूषणाचे अनेक आरोप झाले आहेत. या आरोपांमुळे शेकडो कंपन्यांनी रायगड जिल्हाधिकारी यांच्या कोषागारात नदी संवर्धनासाठी १० कोटी रुपये सुद्धा जमा केले आहेत. परंतु अजूनही प्रत्यक्षात प्रदूषण कमी झाले नाही. नेमके प्रदूषण कोणता कारखानदार करतो याचा शोध पोलीस व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी लावू शकले नाहीत. बुधवारी या प्रकरणी तळोजा पोलिसांना पहिल्यांदा यश आले आहे. गोपनीय माहितीनंतर पोलीस उपनिरिक्षक धुळगंडे यांचे पथक बुधवारी सायंकाळी सव्वापाच वाजता तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये दीपक फर्टीलायझर कंपनीशेजारी भूखंड क्रमांक डब्लू ७५ येथील निडीलॅक्स फाईन केम या कंपनीसमोर दबा धरुन बसले. उपनिरीक्षक धुळगंडे यांचे पथक काही वेळाने निडीलॅक्स कंपनीत शिरल्यावर तेथे तळोजा सीईटीपीच्या वाहिनीत सोडताना पोलिसांनी पकडले. तेथेच ई-साक्षीच्या साह्याने सर्व पुरावे गोळा करण्यात आले. पोलिसांनी केलेल्या संपर्कानंतर तेथे तासाभरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्र अधिकारी उमेश जाधव आले. त्यांनी घटनास्थळावरील रसायनांचे नमुने घेतले. नमुण्याच्या परीक्षणानंतर ब्रोमीन हे घातक रसायनाने भरलेला टॅंकरमध्ये आढळले. निडीलॅक्स ही कंपनी औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे बंद असल्याचे मालकांनी कळवले आहे. बंद कंपनीआड अवैध उद्योग केल्यामुळे कंपनीचा मालक इम्रान अतिक बादशाह शेख (वय ३३) याच्यासह कंपनीचा पर्यवेक्षक प्रकाश राजकुमार भारतीय ( वय २२), टॅंकरचालक बलवंतसिंह मेहलसिंह यांना ताब्यात घेण्यात आले.

# डीपीएस तलाव फ्लेमिंगोसाठी ‘संरक्षित क्षेत्र’ झाल्याने पर्यावरणप्रेमी, नवी मुंबईकरांचा आनंदोत्सव!

**■ नवी मुंबई : धनश्री सट्टा**

नवी मुंबईतील पामबीच मार्गालगतचा डीपीएस तलाव फ्लेमिंगोसाठी ‘संरक्षित क्षेत्र ’ म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केल्यानंतर नवी मुंबईतील पर्यावरणप्रेमी व नागरीकांनी विजयी मार्च काढत आनंदोत्सव साजरा केला. रविवारी डीपीएस तलाव येथील परिसरात मोठ्या संख्येने नागरीक व पर्यावरणप्रेमी आनंदोत्ससवात सहभागी झाले होते.

नवी मुंबईतील नेरूळ येथील डीपीएस फ्लेमिंगो तलाव संरक्षित करण्यासाठी वारंवार साखळी आंदोलन करत नवी मुंबईकर नागरीक व पर्यावरणप्रेमी यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. गतवर्षी तलावात येणारे खाडीचे पाणी रोखल्याने तलावाच्या असव्छतेबाबत पर्यावरणप्रेमींनी सातत्याने आवाज उठवला होता. वनमंत्री गणेश नाईक यांनी गतवर्षी प्रत्यक्ष भेट देत सिडकोने तलावात येणाऱ्या आंतरभरतीच्या पाण्याचा प्रवाह रोखला होता तो सुरु केला होता.त्यामुळे हा तलाव संरक्षित क्षेत्र करण्यासाठी नॅटकनेक्ट तसेच विविध संस्था व विविध पर्यावरणप्रेमी यांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न व साखळी आंदोलने करण्यात आली होती.फ्लेमिंगो सिटी संबोधल्या जाणाऱ्या नवी मुंबईतील पामबीच मार्गालगतच्या तलावात खाडीचे पाणी येत असल्याने सातत्याने येथे फ्लेमिंगोंचा वावर मोठ्याप्रमाणात पाहायला मिळतो. त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांनीच डीपीएस तलाव संरक्षित म्हणून घोषित केल्याने रविवारी नागरीकांनी




तलावाजवळ एकत्र येत आनदोत्सव साजरा कर विजयी मार्च काढत आनंदोत्सव साजरा केला.

नवी मुंबईतील पामबीच मार्गानजिक जागांना करोडोंचा भाव असून या परिसरात कांदळवन नष्ट करुन भूखंड मिळवण्याचा प्रयत्न बांधकाम व्यावसायिकांकडून करण्यात येत असल्याचे पाहायला मिळत आहे. नुकतीच एका व्यावसायिकाने १०० पेक्षा अधिक झाडे तसेच कांदळवन नष्ट केल्याचे पाहायला मिळाले होते.नवी मुंबईला फ्लेमिंगो सिटी संबोधले जात असताना नवी मुंबई महापालिकेच्यावतीने शहरभर विविध चौकात फ्लेमिंगोच्या प्रतिकृती नागरीकांचे लक्ष वेधून घेतात.मात्र दुसरीकडे बांधकाम व्यावसायिक पामबाच मार्गालगतच्या जागा रहिवाशी क्षेत्रासाठी मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे चित्र आहे. त्यामुळे डीपीएस तलावाला संरक्षित क्षेत्र घोषित केल्याने पर्यावरणप्रेमींच आनंद पाहायला मिळाला.

वनमंत्री गणेश नाईक यांनी या शहराला फ्लेमिंगोसिटी संबोधले जात असताना फ्लेमिंगोंच्या प्रतिकृतीपेक्षा त्या पक्षांचा अधिवास टिकावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्याच प्रयत्नाने डीपीएस तलाव संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित झाला आहे. डीपीएस तलावाबाबत घेतलेला निर्णय हा सर्वात वेगवान व निसर्गप्रेमींसाठी आनंददायी निर्णय असून त्याचा आंनदोत्सव सर्व पर्यावरणप्रेमी व नवी मुंबईकर नागरीकांना आहे.

# राष्ट्रीय महामार्गावरील ८ पादचारी पूल पूर्ण; जीवघेण्या धोकादायक प्रवासातून सुटका

**■ वसई : सुचिता देशमुख**

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मंजूर झालेल्या १० पूलांपैकी ८ पुलांचे काम पूर्ण झाले आहे. महामार्गावर रस्ते ओलांडून प्रवास करताना घडणाऱ्या अपघाताच्या घटना रोखण्यासाठी १० पादचारी पूल तयार करण्यात येत आहेत. अन्य दोन पूल ही लवकरच पूर्ण केले जाणार आहेत.

मुंबई, ठाणे, वसई विरार, मीरा भाईदर, पालघर यासह गुजरातला जोडणारा मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या महामार्गालगतच अनेक छोटे मोठे गाव पाडे आहेत. या भागातील नागरिकांना दळणवळणासाठी महामार्ग हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे गाव पाड्यात राहणाऱ्या नागरिकांना महामार्ग ओलांडून धोकादायक प्रवास करावा लागत होता. दिवसेंदिवस महामार्गावर मुंबईत – गुजरात अशा दोन्ही वाहिन्यांवर वाहनांची वर्दळ



वाढली आहे. भरधाव वेगाने वाहने येत असल्याने रस्ते ओलांडून जाताना नागरिकांना व शाळकरी मुलांना अडचणी येत आहेत. काही वेळा रस्ते ओलांडून जाताना भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांच्या धडका लागून अपघाताच्या घटना घडत असतात. काही जणांचा अपघातात मृत्यू झाला आहे तर काही जणांना अपंगत्व आले आहे. अशा घटना सातत्याने समोर येत असल्याने महामार्गावर ज्या भागात गाव पाडे आहेत अशा ठिकाणी नागरिकांना ये जा करण्यास पादचारी पुलांची निर्मिती करावी अशी मागणी करण्यात येत होती. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने वर्सोवा पूल ते पालघर या दरम्यान १० ठिकाणी पादचारी पूल उभारणीचे काम हाती घेतले होते. हे पूल ३५० ते ५०० मीटर लांबीचे असून प्रत्येक पुलासाठी साधारणपणे दीड कोटी रुपये इतका निधी खर्च केला आहे. विरार, बावखळ टोकरेपाडा, वंगणपाडा नालासोपारा, शिवेचापाडा, ससूपाडा, वर्सोवा, दापचेरी, पारसी ढाबा, अवधनी अशा आठ ठिकाणी पादचारी पूल पूर्ण झाले असल्याचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे व्यवस्थापक सुहास चिटणीस यांनी सांगितले आहे. तर कोल्ही चिंचोटी येथे काम प्रगतीपथावर आहे तर एका पुलांची जागा निश्चित झाल्यानंतर ते काम मार्गी लागेल असे चिटणीस यांनी सांगितले आहे. महामार्ग ओलांडून प्रवास करताना अगदी जीव मुठीत धरून जावे लागत होते. कोणती गाडी किती वेगाने येईल याचा अंदाज येत नव्हता. त्यामुळे कधी पुढे मागे करत धाव घ्यावी लागत होती.

# लठ्ठपणावरील औषध स्वस्त होणार... पण २०२६ पर्यंत वाट पाहावी लागणार

**■ मुंबई : प्रथमेश चव्हाण**

लठ्ठपणा कमी करण्यासाठी देण्यात येणारे सेमागुटाईड हे औषध २०२६ मध्ये पेटंटमुक्त झाल्यास त्याचे जेनेरिक औषध बाजारात उपलब्ध होईल. त्यामुळे नागरिकांना लठ्ठपणावरील औषध स्वस्तात उपलब्ध होईल. लठ्ठपणाचा सामना करणाऱ्या देशातील सुमारे १८ कोटींहून अधिक नागरिकांना याचा फायदा होईल.

इंटरनॅशनल मेटाबॉलिक फिजिशियन असोसिएशनचे (इम्पा) दुसरे राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच मुंबईत पार पडले.



मधुमेह आणि लठ्ठपण या दुहेरी आव्हानाला तोंड देण्यासाठी परस्पर संवाद आणि एकात्मिक उपाययोजनांची गरज असल्याचे मत देशातील तज्ज्ञ मंडळींनी या अधिवेशनात व्यक्त केले. लठ्ठपणावर उपलब्ध असलेल्या औषधांपैकी महत्त्वाचे सेमागुटाईड २०२६ मध्ये पेंटटमुक्त होण्याची शक्यता आहे. हे औषध पेंटटमुक्त झाल्यास त्याचे जेनेरिक औषध बाजारात येण्याचा मार्ग मोकळा होईल. यामुळे देशामध्ये लठ्ठपणाच्या समस्येचा सामना करीत असलेल्या रुग्णांना दर्जेदार उपचार उपलब्ध होतील. मात्र मागणी वाढते, तेव्हा गैरप्रकारालाही चालना मिळते, त्यामुळे सतर्कता आवश्यक आहे, असे ‘इम्पा’चे सरचिटणीस डॉ. केतन पखाले यांनी सांगितले.

पुढील वर्षामध्ये सेमागुटाईड पेटंटमुक्त झाल्यास त्याचे जेनेरिक स्वरूपही बाजारात येऊन लठ्ठपणाशी झुंजणाऱ्या १८ कोटींहून अधिक नागरिकांना याचा लाभ होण्याची शक्यता आहे. मेटाबॉलिक विकारांवरील लढ्यात हा एक निर्णायक क्षण ठरू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

भारतामध्ये मधुमेहाच्या रुग्णांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. मधुमेह हा भारतातील सर्वात मोठा आजार समजला जातो. मधुमेहासाठी मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारे एम्पाग्लिफ्लोजिन हे औषध पेटंटमुक्त झाल्याने अनेक भारतीय औषध निर्मात्यांनी या औषधाचे जेनेरिक स्वरुप बाजारात आणले आहे. या जेनेरिक स्वरुपाची किंमत मूळ किमतीच्या ९० टक्के इतक्या कमी आहे.

**पान १ वरुन...**

## प्रकल्पांची कामे निर्धारित...

त्यानुसार या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठीही निर्णय गतीने घेतले जावेत, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. मुंबई व पुणे येथे मेट्रो प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या जागांबाबतही प्राधान्याने कार्यवाही करावी. आवश्यक असलेल्या ठिकाणी तात्काळ भूसंपादन करावे. छत्रपती संभाजीनगर समांतर शहर पाणीपुरवठा योजनेत तांत्रिक अडचणी दूर करून तातडीने कामे सुरू करावीत. मागाठाणे ते गोरेगाव डीपी रोडसाठी मुंबई महानगरपालिकेने जमीन संपादन करून घ्यावी. या मार्गासाठी आवश्यक वन्यजीव विषयक परवानगी त्वरित देण्यात याव्यात. तसेच एमएमआरडीएने प्रकल्पग्रस्तांसाठीच्या सदनिका बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित कराव्यात, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मागील वॉररुम बैठकीत सुमारे १८ प्रकल्पांचा आढावा घेतला होता. त्यावेळी ७३ अडचणींवर चर्चा झाली. त्यापैकी ३१ अडचणींवर मार्ग काढण्यात आले, तर उर्वरित अडचणींवर मार्ग काढण्याची कार्यवाही सुरू आहे. मागील बैठकीत दिलेल्या सूचनांच्या अंमलबजावणीची माहिती मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत घेतली. कार्यवाही न केलेल्या सूचनांवर तातडीने मार्ग काढून कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## कुंभमेळ्याची तयारी अन महिलांना...

डोक्यावर, कमरेवर हंडा, कळशी हातात घेऊन पाण्याच्या शोधात आदिवासी पाड्यावरील या महिला निघतात. एखाद्या विहिरीत थोडेफार पाणी असले की, तिकडे महिलांची रीघ लागते. गावातील निम्याहून अधिक महिला तिथे तुटून पडतात. पाण्यासाठी गावातील महिलांना संघर्ष करावा लागतो. नाशिक जिल्ह्यात पाणी टंचाईचे संकट दिवसेंदिवस अधिक गडद होत चालले आहे. ग्रामीण भागातही दुष्काळाची दाहकता दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. नागरिकांना पाण्यासाठी दाही दिशा भटकण्याची वेळ आली आहे. जिल्ह्यात पाण्याची मागणी वाढली असून जलाशयेही हळूहळू तळाकडे जात आहेत. वेगाने होणाऱ्या बाष्पीभवनामुळे धरणांमधील एकूण पाणीसाठा ३८ टक्क्यांवर आला आहे. गेल्या वर्षीपेक्षा नऊ टक्के पाणी अधिक उपलब्ध असले तरी गौतमी गोदावरी, वाघाड आणि भोजापूर या तीन धरणांमध्ये गेल्या वर्षीपेक्षाही कमी पाणी शिल्लक आहे.उन्हामुळे धरणांमधील पाण्याचेही वेगाने बाष्पीभवन होते आहे. याशिवाय पाण्याची दैनंदिन मागणी आणि वापर वाढल्याने धरणांमधील पाणीसाठाही कमी होऊ लागला आहे. जिल्ह्यात मध्यम आणि मोठ्या आकाराची मिळून एकूण २४ धरणे आहेत. या धरणांची ६५ हजार ६६४ दशलक्ष घनफूट एवढी साठवणक्षमता आहे. गेल्या वर्षी सात एप्रिलला धरणांमध्ये १९ हजार १४७ दशलक्ष घनफूट म्हणजेच २९.१६ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक होता. मात्र, यंदा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात ३८.३६ टक्के म्हणजेच २५ हजार १९० दशलक्ष घनफूट पाणीसाठा उपलब्ध आहे.

## महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा...

त्यावर त्यांनी स्पष्ट नकार दिला आणि त्यांनी कायद्यातही बदल केला त्यामुळे तुम्हाला वाटलं, कुणालाही वाटलं तरीही ते मतदान प्रक्रियेचा व्हिडीओ काढू शकत नाहीत. याचा अर्थ सरळ आहे. निवडणूक आयोगाने तडजोड केली. निवडणूक प्रक्रियेत गंभीर घोळ आहेत हे अगदी स्पष्ट झालं आहे’ असाही आरोप राहुल गांधींनी केला. तसंच मी हा मुद्दा आधीही उपस्थित केला आहे असंही ते म्हणाले. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक नोव्हेंबर २०२४ मध्ये झाली होती. या निवडणुकीत महायुतीला सर्वाधिक २३५ पेक्षा जास्त जागांवर विजय मिळाला. भाजपला सर्वाधिक १३२ जागा मिळाल्या आहेत. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ६० आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांवर विजय मिळाला आहे. महाविकास आघाडीचा मोठा पराभव झाला. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला २०, काँग्रेसला १६ आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला १० जागा मिळाल्या होत्या. या निवडणुकीवर विरोधकांनी तेव्हाही प्रश्न उपस्थित केले होते.

## माजी पोलीस महासंचालक...

दरम्यान असे असले तरी, २० एप्रिल २०२५ मध्ये दाखल करण्यात आलेल्या अधिकृत तक्रारीमध्ये कार्तिकेश त्याने त्याच्या आईवर आरोप केले आहेत, आई त्याच्या वडीलांना गेल्या आठवडाभरापासून जीवे मारण्याची धमकी देत होती, असे या तक्रारीमध्ये म्हटले आहे. या धमक्यांमुळे ओम प्रकाश हे तात्पुरते त्यांची बहीण सरिता कुमारी यांच्या घरी शिफ्ट झाले होते. घटनेच्या दोन दिवस आधी कृती ही सरिता कुमारी यांच्या घरी आली होती आणि तिने ओम प्रकार यांना घरी परत यावे यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला, असा आरोप आहे. ती ओम प्रकाश यांच्या इच्छेविरोधात त्यांना परत घेऊन आली, असेही सांगितले जात आहे.

कार्तिकेश सांगितले की, हत्या झाली त्या दिवशी तो डोमलूर येथील कर्नाटक गोल्फ असोसिएशनमध्ये होता, त्यावेळी त्याच्या शेजारी जयश्री श्रीधरन यांनी संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास त्याला फोन करून त्याचे वडील खाली पडलेल्या अवस्थेत आढळल्याचे सांगितले. तो संध्याकाळी ५.४५ वाजता घरी पोहोचला तोपर्यंत पोलीस आणि लोक आधीच जमले होते.

## राज्यात उष्णतेचा कहर...

दरम्यान, राज्यात विदर्भ, मराठवाड्यात उष्णतेची लाट अनुभवायला मिळत आहे. नागपूर, चंद्रपूर, अकोला, जळगाव आदी शहरांत ४० अंशांचा पुढे तापमान नोंदले आहे. शनिवारी नागपूर येथे सर्वाधिक ४४.७ अंश सेल्सिअस इतकी कमाल तापमानाची नोंद करण्यात आली होती. या तापमानासह नागपूर देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले आहे. राजस्थानमध्ये गेल्या काही दिवसांपासून उष्णतेच्या लाटेसदृश स्थिती आहे. राजस्थानमधील उष्ण वारे गुजरातवरुन राज्यात येत आहेत. याचाच परिणाम म्हणून पुढील चार पाच दिवस राज्याच्या तापमानात वाढ होणार आहे. मुंबईतही ही वाढ पहायला मिळणार आहे. त्यामुळे मुंबईकरांना पुढील दोन तीन दिवस असह्य उकाडा आणि उन्हाचा तडाखा सहन करावा लागणार आहे.

## इतर भाषांचा द्वेष म्हणजे...

परंतु हिंदी भाषा मला नीट समजत नाही, ही माझी मोठी कमकुवत बाजू आहे. मला हिंदी भाषा समजली तर मी तळागाळातील गरिबांच्या भावभावना समजू शकतो. भारत जगातील सर्वात मोठी पाचवी अर्थव्यवस्था असलेला देश आहे. परंतु अद्यापही भारतातील २० टक्के जनता गरीब आहे. त्यामुळे मी गरिबांच्या भावना समजू शकलो नाही, तर नेता होऊ शकत नाही. तुम्ही सर्वच भाषा शिकू शकत नाही, परंतु काही भाषा शिकणे आवश्यक आहे. त्यामुळे आपली कार्यक्षमता इतरांपेक्षा चांगली वाढू शकेल. विद्यार्थ्यांनी विविध भाषा शिकायला हव्या. त्याचा शैक्षणिक व भविष्यात व्यावसायिक स्तरावर फायदा होईल. अनेकांना उद्योग किंवा कामानिमित्त परदेशात जावे लागते. अशा व्यक्तींना त्या देशातील भाषा अवगत असेल तर व्यवहार करणे सोपे होते. जर्मन, तसेच जापनी भाषा आली, तर तुम्ही त्या देशात व्यवस्थित राहून कार्य करू शकता. त्यामुळे ज्या देशात कामासाठी किंवा शिक्षणासाठी जाता, त्या देशातील भाषा शिकण्याचा निर्धार करायला हवा’ , असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सांगितले.

# शहरात धुमाकूळ घालणारा भामट्या पोलीस जेरबंद

■ **पुणे : विशेष प्रतिनिधी**

पोलीस असल्याची बतावणी करून ज्येष्ठांना लुटणाऱ्या चोरट्याला गुन्हे शाखेच्या युनिट सहाने अटक केली. चोरट्याकडून आठ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्याने शहराच्या वेगवेगळ्या भागासह सासवड परिसरात गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. चोरट्याकडून साडेसात लाख रुपयांचे दागिने आणि दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. हमीद अफसर खान (३०, रा. पठारे वस्ती, लोणी काळभोर) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. पुणे शहर, तसेच परिसरात पादचारी ज्येष्ठ नागरिकांकडे पोलीस असल्याची बतावणी करून त्यांना लुटण्याचे गुन्हे घडले होते. पोलीस असल्याची बतावणी करून खान याने ज्येष्ठ िकडील दागिने चोरून नेले होते. या गुन्ह्यांचा समांतर तपास गुन्हे शाखेच्या युनिट सहाकडून करण्यात येत होता. ज्येष्ठांना लूटणारा चोरटा हमीद खान हा लोणी काळभोर परिसरातील स्मशानभूमीजवळ येणार असल्याची माहिती गस्त घालणारे पोलीस कर्मचारी नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत खान



आणि त्याच्याबरोबर असलेल्या साथीदाराने पोलीस असल्याची बतावणी करून ज्येष्ठ नागरिकांना लुटल्याची कबुली दिली. खान आणि साथीदाराने पर्वती, कोथरूड, कोंढवा, सिंहगड रस्ता, भारती विद्यापीठ, तसेच सासवड परिसरात लूटमारीचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याच्याकडून सात लाख ६८ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि दुचाकी असा आठ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्हे शाखा युनिट सहाचे पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, सहायक निरीक्षक मदन कांबळे, उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, बाळासाहेब सकटे, रमेश मेमाणे, सुहास तांबेकर, सचिन पवार, ऋषीकेश ताकवणे, ऋषीकेश व्यवहारे, बाळासाहेब तनपुरे, गणेश डोंगरे, नितीन घाडगे, शेखर काटे, प्रतिक्षा पानसरे, कीर्ती नरवडे यांनी ही कामगिरी केली.

पादचारी ज्येष्ठ नागरिकांकडे बतावणी करून शम्दिंगदत्दुब ऐवज चोरण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. चोरट्यांच्या बतावणीकडे दुर्लक्ष करा. बतावणी करणारा चोरटा आढळून आल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस असल्याची बतावणी, तसेच 'मालकाला मुलगा झाला आहे. ज्येष्ठांना धान्य वाटप, कपडे वाटप करण्यात येत आहे', अशी बतावणी करून चोरटे फसवणूक करीत असल्याचे उघडकीस आले आहे.

# कल्याणमधील आंबिवलीतील रुग्णालयाने बनावट रुग्ण दाखवून मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून चार लाख उकळले

■ **कल्याण : विशेष प्रतिनिधी**

कल्याण जवळील आंबिवलीतील एका खासगी रुग्णालयाच्या चालक आणि अन्य दोन जणांनी संगनमत करून १३ रुग्णांच्या शस्त्रक्रिया आणि औषधपचाराची बनावट कागदपत्रे तयार करून मुख्यमंत्री साहय्यता निधीतून चार लाख ७५ हजार रूपये उकळले असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीला आला आहे. २६ मे २०२३ ते १० जुलै २०२३ या कालावधीत मुख्यमंत्री साहय्यता निधीतून निधी लाटण्याचा प्रकार घडला आहे. मुख्यमंत्री साहाय्यता निधीचे साहाय्यक संचालक देवानंद सखाराम धनावडे (५०) यांनी या फसवणूक प्रकरणी गुरुवारी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ४२० (फसवणूक), ४०६, ४६५, ४६८, ४७१, ३४ या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

साहाय्यता निधी कक्षाच्या छाननीत हा निधी उकळण्याचा प्रकार निदर्शनास



आल्यानंतर मुख्यमंत्री साहाय्यता निधी प्रशासनाकडून ठाणे आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे तक्रार करण्यात आली होती. या प्रकरणाची सविस्तर चौकशी आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडून करण्यात आली. या प्रकरणात प्रथमदर्शनी चौकशी पथकाला तथ्य आढळून आल्याने याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचा निर्णय साहाय्यता निधी कक्षाने घेतला. आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाचा अहवाल आणि मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षाचे साहाय्यक संचालक देवानंद धनावडे यांचा अहवाल खडकपाडा पोलिसांना प्राप्त झाल्यानंतर गुरुवारी या फसवणूक प्रकरणी रुग्णालय चालक आणि अन्य दोघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

खडकपाडा पोलीस ठाण्यात साहाय्यक संचालक देवानंद धनावडे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आंबिवली मोहने पूर्वेतील शिव निर्मल हाईट्समधील पहिल्या माळ्यावरील गणपती मल्टी स्पेशालिटीचे रुग्णालयाचे डॉ. अनुदुर्ग ढोणी (४५, रा. आंबिवली), प्रदीप बापू पाटील (४१, रा. ओम गिरीधर गौरीपाडा, कल्याण.), ईश्वर पवार (रा. धुळे) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला.

साहाय्यक संचालक धनावडे यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, की डॉ. अनुदुर्ग ढोणी यांचे आंबिवली पूर्व येथे गणपती मल्टि स्पेशालिटी रुग्णालय आहे. मुख्यमंत्री साहाय्यता निधीकडे दाखल प्रस्तावामध्ये आंबिवली पूर्वेतील गणपती मल्टी स्पेशालिटी रुग्णालयामध्ये १३ रुग्ण दाखल आहेत. त्यांच्यावर या रुग्णालयात शस्त्रक्रिया आणि त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले आहेत, अशी बनावट कागदपत्रे ग्रुहा दाखल तीनही व्यक्तींनी तयार केली, अशी तक्रार आहे. ही कागदपत्रे खरी आहेत, असा प्रस्ताव तयार करून तो प्रस्ताव मुख्यमंत्री

# गाडी उभी करण्याच्या वादातून पाच जणांना लोखंडी रॉडने मारहाण; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

■ **पुणे : विशेष प्रतिनिधी**

राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुणे जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. गाडी उभी करण्याच्या वादातून संतप्त झालेल्या व्यक्तीने लोखंडी रॉडने पाच जणांना मारहाण करून गंभीर दुखापत केल्याची धक्कादायक घटना ब्राह्मणवाडी साते (ता. मावळ) येथे घडली आहे. याप्रकरणी एकाविरुद्ध वडगाव मावळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय शंकर शिंदे (वय ३७, रा. ब्राह्मणवाडी साते) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १७ एप्रिल रोजी रात्री साडेदहा वाजता घरासमोरील जागेत कोणाच्या परवानगीने गाडी लावली, यावरून वाद निर्माण



झाला. या वादात फिर्यादीचे नातेवाईक दाजी दत्तात्रय भानुसघरे व सिद्धेश यांच्याशी आरोपीने शिवीगाळ करत दमदाटी केली व लोखंडी रॉडने मारहाण केली. या भांडणात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या विजय शिंदे यांना देखील आरोपीने डोक्यात रॉडने मारून गंभीर दुखापत केली. त्यांच्यासोबतच त्यांच्या आई हौसाबाई शिंदे व पत्नी रुपाली शिंदे यांना देखील आरोपीने शिवीगाळ करत मारहाण केली. यानंतर, वादाविषयी विचारणा करणाऱ्या विजय यांचे मेहुणे रुपेश भरत पिपरकर यालाही मारहाण करण्यात आली. या प्रकरणी वडगाव मावळ पोलिसांनी आरोपीविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून, पोलीस हवालदार वायळ पुढील तपास करत आहेत.

# भाईंदरच्या तरणतलावात बुडून ११ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू, जीवरक्षकांचा निष्काळजीपणा असल्याचा आरोप

■ **वसई : विशेष प्रतिनिधी**

मिरा भाईंदर महापालिकेच्या क्रिडा संकुलातील तरण तलावात बुडून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. रविवारी दुपारी १२ च्या सुमारास ही दुर्घटना घडली आहे. ग्रंथ मुथा असे या मयत मुलाचे नाव आहे. क्रिडा संकुलातील जीवरक्षकांच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. भाईदर पूर्व येथील गोल्डन नेस्ट भागात मिरा भाईंदर महापालिकेचा गोपिनाथ मुंडे क्रिडा संकुल आहे. या क्रिडा संकुलाचे व्यवस्थापन खाजगी ठेकेदाराकडे देण्यात आले आहे. नागरिकांना माफकत माफत दरात व्यायाम शाळा बॅडमिंटन, टेबल टेनिस, बॉक्सिंग आदी विविध खेळांची सुविधा देण्यात आली आहे. या क्रिडा संकुलात तरणतलाव आहे. रविवारी सकाळी १० वाजता ग्रंथ मुथा (११) हा चिमुकला तरणतलावात नेहमीप्रमाणे पोहण्यासाठी आला होता. मात्र तो पाण्यात बुडाला. त्याला उपचारासाठी तुंगा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्याला मयत घोषीत केले. पालिकेच्याच क्रिडा संकुलातील तरण तलावात ही घटना घडल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

माझ्या मुलासोबत इतर अनेक जण तरण तलावात होते. १२ च्या सुमारास सर्वजण बाहेर आले तेव्हा माझा मुलगा दिसला नाही. तेव्हा त्याचा शोध घेतला असता तो तरण तलावात तरंगताना आढळला. १० मिनिटे तो तरणतलाच्या पाण्यात तरंगत




होता. जर त्याला वेळीच उपचार मिळाले असते तर तो वाचला असता असे मयत ग्रंथचे वडील हसमुख मुथा यांनी सांगितले. जीवरक्षकांचा निष्काळचीपणा कारणीभूत असल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणी दोषींवर कडक कारवाई व्हावी, अशी त्यांनी मागणी केली. आमदार नरेंद्र मेहता यांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. या घटनेबद्दल त्यांनी दु:ख व्यक्त केले आहे. याप्रकरणी सीसीटीव्ही तपासून तसेच उपस्थितांचे जबाब नोंदवून सखोल कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

# डोंबिवलीतील सात झोपडपट्ट्यांमधील कुख्यात गुन्हेगार पोलिसांच्या रडारवर, तडीपारी, मोक्का, एमपीडीए कारवाईसाठी गुन्हेगारांची छाननी सुरू

■ **डोंबिवली : विशेष प्रतिनिधी**

डोंबिवली शहर परिसरातील गुन्हेगारीला या शहरातील विविध झोपडपट्ट्यांमध्ये वर्षानुवर्ष राहत असलेले कुख्यात गुंड कारणीभूत असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक पाहणीत आढळून आले आहे. त्यामुळे डोंबिवलीतील सात झोपडपट्ट्यांमध्ये राहत असलेल्या कुख्यात गुन्हेगारांची माहिती संकलित करून त्यांच्यावर तडीपारी, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा, मोक्का कायद्याने कारवाई करण्यासाठी पोलिसांनी हालचाली सुरू केल्या आहेत. या गुन्हेगारांवर यापूर्वी डोंबिवलीतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल गुन्ह्यांवरून अटकेच्या कारवाया झाल्या आहेत. परंतु, हे गुन्हेगार तुरुंगातून सुटून आल्यावर पुन्हा आपल्या गुन्हेगारी कारवाया करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. हे मोकाट असलेले गुन्हेगार शहरात चोऱ्या, लुटमार, परिसरात शस्त्रे घाऊन दहशत माजविणे, पादचाऱ्यांची लुटमार करणे असे प्रकार करत आहेत. डोंबिवली, कल्याण शहर परिसरात गुन्हा करायचा आणि आपल्या झोपडपट्टीत येऊन लपून राहायचे अशी या गुन्हेगारांची वर्षानुवर्षाची पध्दत आहे.

हे गुन्हेगार राहत असलेल्या भागात नेहमीच रात्रीच्या वेळेत भांडणे, शस्त्रांचा वापर करून परिसरात दहशत माजविणे, रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणे, जुन्या वादातून भांडण उकरून काढून एखाद्याला मारहाण करणे, दोन व्यवहारांमध्ये मध्यस्थी करून पैसे उकळण्याचा प्रयत्न करणे, असे प्रकार




नियमित करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. मागील सहा महिन्याच्या काळात पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी कल्याण, डोंबिवली शहरांमध्ये नशामुक्त अभियान राबवून या शहरांमधील मद्य, चरस, गांजा, अंमली पदार्थ तस्करीचे अड्डे उध्दवस्त केले आहेत. हे अड्डे चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे. शहरात अंमली पदार्थ घेऊन येणाऱ्यांचा कायमस्वरुपी बंदोबस्त केला आहे. डोंबिवली, कल्याण शहरे नशामुक्त करण्याबरोबर गुन्हेगारी मुक्त करायची असतील तर या शहरांमधील झोपडपट्टी भागात वर्षानुवर्ष राहत असलेल्या कुख्यात गुन्हेगारांवर कारवाई होणे खूप गरजेचे असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे मत झाले आहे. त्यामुळे डोंबिवलीतील ज्योतीनगर, शेलारनाका पाथर्ली, त्रिमूर्तीनगर, आंबेडकर वसाहत, इंदिरनगर, पाथर्ली, दत्तनगर, आयरेगाव, सिध्दार्थनगर अशा झोपडपट्टयांमधील कुख्यात गुन्हेगारांची माहिती जमा करून त्यांच्यावर तडीपारी, संघटित गुन्हेगारी, मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यासाठी पोलिसांनी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. अशा सर्व गुन्हेगारांवर दाखल गुन्ह्यांची माहिती, त्याचे स्वरुप पाहून ही माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार आहे. दाखल गुन्ह्यांप्रमाणे या गुन्हेगारांवर कोणती कारवाई करायची याचा निर्णय घेण्यात येणार आहे, असे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. दोन महिन्यापूर्वीच कोळसेवाडी पोलिसांनी कुख्यात मयत विशाल गवळीचे तीन भाऊ ठाणे, रायगड, मुंबई जिल्ह्यातून हद्दपार केले आहेत.

# महामार्गावर वाहतुक नियमांचे बेदरकार उल्लंघन, १५ महिन्यांत १३ कोटी रुपयांच्या दंडाची आकारणी

■ **ठाणे: विशेष प्रतिनिधी**

ठाणे आणि पालघर जिल्ह्यात महामार्गाचे जाळे आहे. या जिल्ह्यातील महामार्गावर अनेक ठिकाणी बेदरकारपणे वाहने चालविली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. ठाणे महामार्ग पोलिसांनी या दोन जिल्ह्यांतील महामार्गावर वाहन चालकांविरुद्ध कारवाई केली. त्यामध्ये १३ कोटी ७४ लाख रुपयांच्या दंडाची कारवाई करण्यात आली आहे. .

ठाणे आणि पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गांचे जाळे आहे. या दोन्ही जिल्ह्यात गोदामांची संख्या मोठ्याप्रमाणात आहे. त्यामुळे उरण



जेएनपीटीहून भिवंडी, गुजरात आणि नाशिकच्या दिशेने हजारो अवजड वाहनांची वाहतुक होते. तसेच हलक्या वाहनांची वाहतुक देखील येथून मोठ्याप्रमाणात होत असते. बेदरकार वाहन चालक, मोटार चालविताना आसन पट्ट्याचा वापर करण्यास टाळणे, दुचाकीवर विना शिरस्त्राण वाहन चालविणे अशा विविध नियमांच्या उल्लंघना प्रकरणी महामार्ग पोलिसांकडून कारवाई होत असते. महामार्ग पोलिसांनी १ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत १३ कोटी ७४ लाख ६२ हजार रुपयांची दंडाची कारवाई केली आहे.

ठाणे महामार्ग पोलिसांच्या हद्दीत चिंचोटी, मनोर, चारोटी, शहापूर आणि मालशेज हे क्षेत्र येतात. या क्षेत्रात महामार्ग पोलिसांनी वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत १० कोटी ३२ लाख ८४ हजार रुपयांचा दंड आकारला. तर १ जानेवारी ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत ३ कोटी ४१ लाख ७८ हजार २०० रुपये इतका दंड आकारण्यात आला. २०२४ या संपूर्ण वर्षात पोलिसांनी ७६ हजार ७३७ इतक्या कारवाया केल्या. तर या वर्षी ३१ मार्च पर्यंत २२ हजार ४१४ इतक्या कारवाया झाल्या आहेत.

# बनावट प्रमाणपत्र... वय लपवले... दुबई जाणाऱ्या प्रवाशांना विमानात चढण्यापूर्वीच पकडले

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरून संयुक्त अरब अमिराती निघालेल्या दोन प्रवाशांना अडवून इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी त्यांची कसून तपासणी केली. दोघांच्या पारपत्रातील वय व त्यांचे प्रत्यक्ष वय यामध्ये तफावत आढळली, त्यानंतर या प्रवाशांना ताब्यात घेण्यात आले, असे अधिकाऱ्याने सांगितले. बंगळुरूमधील रहिवासी लाल मोहम्मद (५७) आणि बिहारमधील इमाम हुसेन (५९) यांच्या पारपत्रामध्ये अनुक्रमे वय ४६ आणि ४९ वर्षे नमुद करण्यात आले होते. सहार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघांनी नवीन पारपत्र मिळवताना बनावट जन्म प्रमाणपत्राचा वापर केला होता. तपासणीत ही बाब उघड झाल्यानंतर पोलिसांनी दोघांना फसवणूक आणि बनावट कागदपत्र तयार केल्याच्या आरोपाखाली अटक केली. दोन्ही आरोप सध्या पोलीस कोठडीत आहेत. आखाती देशांत कामासाठी जाणाऱ्या व्यक्तीचे वय



५० वर्षापेक्षा जास्त नसावे असा नियम आहे. आपले वय ५० वर्षापेक्षा अधिक असल्यामुळे आखाती देशात नोकरी मिळणे अशक्य होते. त्यामुळे त्यांनी जुने पारपत्र लपवून नवीन पारपत्रासाठी बनावट कागदपत्रे सादर केली. त्यांनी नवीन पारपत्र बनवून घेतले, असे या दोघांनी इमिग्रेशन अधिकाऱ्यांना चौकशीत सांगितले. मात्र इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी दोघांची लबाडी पकडली. त्यानंतर सहार पोलिसांना याबाबतची माहिती देण्यात आली. पोलिसांनी तात्काळ दोघांना ताब्यात घेऊन फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे व पारपत्र कायद्याअंतर्गत दोघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. याप्रकरणी सहार पोलीस अधिक तपास करीत आहेत. लाल मोहम्मद याचा जन्म १९६७ मध्ये झाला होता. त्याबातची माहिती लाल मोहम्मदच्या जुन्या पारपत्रात नमुद करण्यात आली होती. पण आखाती देशांतील वयोमर्यादेनुसार त्याने नवीन पारपत्र बनवले. या नवीन पारपत्रामध्ये त्यांनी जन्म वर्ष १९८४ दाखवले, म्हणजेच त्यांनी स्वतःचे वय १७ वर्षांनी कमी दाखवले. तसेच, इमाम हुसेन याने जुने पारपत्र मिळवताना १९६६ साली जन्म झाल्याचे प्रमाणपत्र सादर केले होते, पण नवीन पारपत्रांमध्ये जन्मवर्ष १९७६ असे नमूद केले होते.

# खेळण्याच्या वादातून ७ वर्षीय बहिणीची हत्या, १३ वर्षीय भाऊ पोलिसांच्या ताब्यात

■ **वसई: विशेष प्रतिनिधी**

खेळण्यावरून झालेल्या भांडणात १३ वर्षीय मुलाने आपल्या ७ वर्षीय लहान बहिणीची कटरने गळ्यावर वार करून हत्या केल्याचा प्रकार नालासोपारा येथे उघडकीस आला आहे. मध्यवर्ती गुन्हे शाखेने या प्रकरणी अल्पवयीन भावाला ताब्यात घेतले आहे. शवविच्छेदन अहवाल आणि मुलीच्या मानेवरील संशयास्पद जखमा यामुळे या प्रकरणाचा उलगडा झाला. मार्च महिन्यात देखील १२ वर्षीय मुलाने आपल्या ६ वर्षीय आत्येबहिणीची गळा दाबून हत्या केली होती. नालासोपारा पूर्वेच्या संतोषभुवन परिसरात असलेल्या पांडुरंग चाळीत मिथुन शर्मा हे पत्नी आणि दोन लहान मुलासंह राहतात. त्यांचा मोठा मुलगा १३ वर्षांचा तर मुलगी अंजली ही ७ वर्षांची आहे. शर्मा दांपत्य दिवसभर कामाला जातात. त्यांची दोन्ही मुले घरात एकटी असतात. गुरूवारी दुपारी नेहमीप्रमाणे शर्मा पती-पत्नी कामाला गेले होते. त्यांचा मोठा मुलगा खेळण्यासाठी बाहेर गेला होता. काही वेळाने तो घरात आला आणि लहान बहिणी स्टूलवरून खाली पडल्याचे त्याने शेजाऱ्यांना सांगितले. खाली धागा कापण्याचा कटर होता. स्टूलवरून बहिण या कटरवर पडली आणि जखमी होऊन मरण पावली असे त्याने सांगितले होते. त्याच्या वडिलांनीही तशीच फिर्याद दिली होती. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुरूवारी रात्री अपमृत्यूची नोंद करण्यात आली होती.

मात्र तिच्या गळ्याला असलेल्या जखमा या संशयास्पद होता. पेल्हार पोलिसांबरोबर मध्यमवर्ती गुन्हे शाखा या प्रकरणाचा समांतर तपास करत होती. शनिवारी शवविच्छेदनाला अहवाल आला. त्यावेळी अंजलीचा मृत्यू हा गळ्यावर वार करून झाल्याचे स्पष्ट आहे. मध्यवर्ती गुन्हे शाखेचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश कुराडे यांच्या पथकाने मुलाला ताब्यात घेऊन चौकशी केली आणि त्याने हत्येची कबुली दिली. विधीसंघर्षित मुलगा हा उनाड मुलगा आहे. तो १३ वर्षांचा असला तरी नापास होत असल्याने तिसरीत आहे, असे त्यांनी सांगितले.याबाबत माहिती देताना पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी सांगितले की, या मुलांचे आई वडील कामावर जातात. मुले घरात एकटी असतात. गुरूवारी अंजलीने मोठ्या भावाला उन्हात खेळायला जाऊ नको म्हणून सांगितले होते. त्यातून त्यांच्यात भाडणं झाली होती. त्यामुळे भावाने तिची हत्या केली. भावाकडून लहान बहिणीची हत्या होण्याची पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ही दुसरी घटना आहे. २ मार्च रोजी नालासोपारा पूर्वेच्या श्रीराम नगर येथे शिद्राखातून या ६ वर्षीच्या मुलीची १२ वर्षाच्या आत्येभावाने हत्या केली होती. सर्वजण लहान बहिणीचा लाड करायचे.

# हिंदीची सक्ती मुळासकट उखडून फेकू, उद्धव ठाकरे यांची रोखठोक भूमिका

■ मुंबई : मेहुल गायकवाड

शालेय शिक्षणात हिंदी भाषा पहिलीपासून सक्तीची करण्याच्या सरकारच्या धोरणाविरोधात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. हिंदीची सक्ती पहिलीपासून कशासाठी असा सवाल त्यांनी केला. आम्ही प्रेमाने सगळे ऐकू, पण सक्ती कराल तर मुळासकट उखडून फेकू, अशी रोखठोक भूमिका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी घेतली. ते दादरच्या शिवाजी महाराज मंदिर नाट्यगृह येथील महाराष्ट्र कामगार सेनेच्या कार्यक्रमाला संबोधित करीत होते. जे अमराठी मुंबईमध्ये राहताहेत, वर्षानुवर्षे, पिढ्यानं पिढ्या राहताहेत त्यांना 'चला मराठी शिकवूया' हे अभियान शिवसेनेने सुरू केले. त्याला उत्तर भारतीयांचा चांगला प्रतिसाद मिळत



आहे हे बघितल्यानंतर यांच्या पोटात गोळा आला, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी या वेळी केली. इथे राहता, इथले मीठ खाता आणि मराठी भाषेला तुम्ही विरोध करता, असा सवाल करताना जसे आपण म्हटले होते 'इस देश में रहना होगा तो वंदे मातरम् कहना होगा' तसे 'इस राज्य में रहना होगा तो जय महाराष्ट्र बोलनाही होगा, असा इशारा ठाकरे यांनी दिला. आम्ही अस्सल मराठी, मराठी भाषा बोलणारे हिंदू आहोत. हिंदीची सक्ती होऊ देणार नाही हे पुन्हा सांगतो. फडणवीसांना सांगतो तुमचे ते जोशी आले होते ना, मध्ये माशी शिंकल्यासारखे शिंकून गेले, जोशी का माशी, अशी टीका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याची जोशी यांच्या विधानाची आठवण करून देताना त्यांनी केली. ते जिथे बोलले त्या घाटकोपरमध्ये पहिल्यांदा तिथे मराठी सक्ती करून दाखवा. घाटकोपरमध्ये मराठी आलेच पाहिजे आणि मग आम्ही हिंदीचे काय आहे ते बघून घेतो. तिथला प्रत्येक माणूस मराठी बोलणारा दाखवा, असे आव्हान त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले. स्वतःच्या भाषेवर प्रेम करताना दुसऱ्या भाषांचा द्वेष करून आपण पुढे जाऊ शकत नाही. इतर भाषांचा द्वेष करणे म्हणजे स्वतःच्या मातृभाषेवर प्रेम करणे नाही. आपल्याला मातृभाषा प्रचंड आवडते, यात काही वावगे नाही. परंतु तुम्हाला विविध भाषा बोलता येणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपण अधिक प्रगत बनतो', असे स्पष्ट मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या स्थापना दिन सोहळ्यात व्यक्त केले. अनेकांना उद्योग किंवा कामानिमित्त परदेशात जावे लागते.

## वैद्यकीय व्यवस्थेत बदल करण्याची गरज -डॉ. अनंत फडके

■ पुणे : अभिजीत येरल्लू

'देशातील वैद्यकीय व्यवस्थेत बदल करण्याची गरज आहे. त्यात वैद्यकीय शिक्षण, औषधनिर्मिती क्षेत्र, प्रयोगशाळा, रुग्णालये या सर्वच स्तरांवर बदल आवश्यक आहेत. मात्र, त्यात अनेक आव्हानेही आहेत,' असे मत ज्येष्ठ आरोग्यतज्ज्ञ डॉ. अनंत फडके यांनी मांडले. हॅलो मेडिकल फाऊंडेशन, साधना प्रकाशनातर्फे अतुल देऊळगावकर यांच्या 'शशिकांत अहंकारी : दृष्टी आरोग्यक्रांतीची' या पुस्तकाचे प्रकाशन एस. एम. जोशी सभागृहात झाले. त्यावेळी डॉ. फडके बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मनीषा गुप्ते, फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ. शुभांगी अहंकारी, साधनाचे संपादक विनोद शिरसाठ या वेळी उपस्थित होते. वैद्यकीय क्षेत्रात पुढील पिढ्या घडवण्याचे काम डॉ. अहंकारी यांनी केल्याचे नमूद करून डॉ. फडके म्हणाले, 'डॉ. अहंकारी यांनी चळवळीच्या स्वरूपात काम केले. महिलांचे सक्षमीकरण केले. त्यांनी ग्रामीण भागात उभे केलेले काम फार




महत्त्वाचे आहे. त्यांचे काम जवळून पाहता आले. आज देशातील ५० टक्के वैद्यकीय महाविद्यालये खासगी आहेत. वैद्यकीय पदवीला कोट्यवधी रुपये लागतात. या विद्यार्थ्यांना वैद्यकीयदृष्ट्या काहीही कळत नाही. सरकारी महाविद्यालयातही वेगळी स्थिती नाही. हा व्यवस्थेचा दोष आहे. सगळ्या सुविधा, तंत्रज्ञान असूनही शिक्षण निरुपयोगी आहे. औषधनिर्मिती कंपन्यांचे गैरप्रकार वाढले आहेत. रुग्णालये कॉर्पोरेट झाली आहेत. ही व्यवस्था बदलण्याची गरज आहे.' 'वंचितांचे नेतृत्व असेल, तर व्यवस्था बदलते. आरोग्यदायी समाजाची निर्मिती होणे गरजेचे आहे. मात्र, आज देशात हिंसेचे, घृणेचे राजकारण होताना दिसत आहे. डोक्यात विष पेरले जात आहे. ही परिस्थिती धुवून काढण्यासाठी तीन-चार पिढ्या लागणार आहेत, असे गुप्ते यांनी सांगितले. अनेकदा आपल्याकडे चांगल्या कामाला संस्थात्मक रूप मिळत नाही. मात्र, डॉ. अहंकारी यांनी त्यांच्या कामाला संस्थात्मक रूप दिले. या पुस्तकाचे इंग्रजी रूपांतर झाल्यास डॉ. अहंकारी यांचे काम जागतिक स्तरावर पोहोचेल. आरोग्य हा वैश्विक मुद्दा आहे.

## महापालिकेची चैतालय मंदिर पाडण्याच्या संदर्भात नोटीस; लाखो जैन समाजबांधव रस्त्यावर उतरले

■ मुंबई : गणेश बागडे

न्यायालयातली सुनावणी होण्यापूर्वीच मुंबई महापालिकेने जैन समाजाचे विलेपार्ले येथील मंदिरावर तोडक कारवाई केली. यामुळे जैन समाजात तीव्र संताप उसळला आहे.



लाखो जैन समाजबांधव रस्त्यावर उतरले आहेत. विलेपार्ले पूर्व येथील नेमिनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या आवारातील ३० वर्षे जुने जैन चैतालय या मंदिरावर महापालिका प्रशासनाने बुलडोझर चालवला होता. यामुळे जैन धर्मीय व्यथित झाले आहेत. जैन मंदिर पाडल्याच्या निषेधार्थ शनिवारी (१९ एप्रिल) समुदायाकडून मुंबईत विराट मोर्चा काढण्यात आला. यावेळी मुंबईतील संपूर्ण जैन आणि हिंदू समाज हिंदू विश्व परिषदेचे सदस्य, जैन समाजाचे सर्व विश्वस्त, मंडळे, संस्था सहभागी झाल्या होत्या. विलेपार्ले पश्चिम रेल्वे स्थानकापासून शांततेत हा मोर्चा निघाला. महापालिकेने चैतालय मंदिर पाडण्याच्या संदर्भात नोटीस दिली होती. या विरोधात येथील जैन बांधवांनी शहर दिवाणी न्यायालयात धाव घेतली होती. सूत्रांनुसार, या याचिकेवर १७ एप्रिल रोजी सुनावणी होणार होती. त्यामुळे मंदिरावर कारवाई करू नका, अशी विनंती लोकांनी केली होती. मात्र, सुनावणी होण्यापूर्वीच १६ एप्रिलला कारवाई करण्यात आली. मंदिर पाडण्यास परवानगी देण्यास न्यायालयाने तोंडी स्थगिती दिल्याचे जैन धर्मियांचे म्हणणे आहे.

## मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नरेंद्र मोदींच्या हस्ते वाशी पुलाचे लोकार्पण

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

मुंबई ते नवी मुंबई वाहतूक सुरळीत करणाऱ्या ठाणे-वाशी खाडीवरील तिसऱ्या पुलाच्या दक्षिण मार्गिकेचे येत्या काही दिवसांत लोकार्पण होण्याची शक्यता आहे. तसेच, हा लोकार्पण सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार असल्याचे समजते आहे. ठाणे-वाशी खाडी पूल हा सर्वाधिक वाहतुकीचा आणि मुंबईला नवी मुंबईशी जोडणारा दुवा मानला जातो. गेल्या वर्षी अटलसेतू झाल्यानंतर वाशी उड्डाणपुलावरील ताण काहीसा कमी झाला होता. तसेच उरण, पनवेलची वाहतूक अटल सेतूवरुन जात होती. परंतु शासनाच्या टोलमाफीनंतर अटल सेतूवरुन मुंबईला दररोज जाणाऱ्या १० ते १२ हजार गाड्यांची वाहतूक पुन्हा वाशी खाडीपूल मार्गाने होत आहे. मुंबईहून वाशीकडे येणाऱ्या पुलावरुन वाहतूक सुरू झाली असली तरी मानखुर्द दिशेकडील काम सुरू असल्याने मुंबईहून वाशीकडे येताना ५ लेनची वाहतूक २ लेनमध्ये वर्ग होत होती. त्यामुळे उड्डाणपुलाच्या तोंडाशी मानखुर्दपर्यंत रांगा लागत होत्या. परंतु आता हे काम पूर्णत्वास आले असून ठाणे-वाशी दरम्यानच्या तिसऱ्या पुलाचेही काम आता पूर्ण झाले आहे. या तिसऱ्या खाडी पुलाच्या उत्तर मार्गिकेचे लोकार्पण २०२४ च्या ऑक्टोबर महिन्यात पार पडले होते. आता येत्या काही दिवसांत या पुलाच्या दक्षिण मार्गिकेचे लोकार्पण होईल. या तिसऱ्या खाडीपुलाचा एकूण खर्च ७७४ कोटी असून या दोन्ही पुलांची लांबी ही ३.१८ किलोमीटर आहे. तसेच, टोल भरण्यासाठी रांगा लागू नयेत म्हणून २० टोलबूथ देखील



बसविण्यात आले आहेत.

वाशीवरुन मुंबईला जाताना ११ लेनची वाहतूक दुसऱ्या उड्डाणपुलाच्या तोंडाशी टोलनाक्यावर फक्त दोन लेनमध्ये वर्ग होत असल्याने सकाळी व संध्याकाळी वाहनचालकांना वाहतूककोंडीचा सामना करावा लागत होता. परंतु, आता एल अँड टी कंपनीकडून उभारण्यात आलेल्या तिसऱ्या पुलाचे काम पूर्ण झाल्याने पुढील काही दिवसांतच वाशी उड्डाणपुलावरील सततच्या वाहतूक कोंडीतून वाहनचालकांची सुटका होणार आहे.

## करंजा मच्छीमार बंदर 'गाळात'; गाळ सफाई करण्याची मच्छीमारांची मागणी

■ उरणः सुचिता देशमुख

मुंबईच्या ससून बंदराला पर्याय म्हणून उरणच्या करंजा येथे नवे मच्छीमार बंदर उभारण्यात आले आहे. मात्र दोन वर्षांच्या आतच या बंदरात गाळाची समस्या निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे भरती-ओहटीच्या वेळी मासेमारी बोटी हाताळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. महाराष्ट्र फिशरमन कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मार्तंड नाखवा यांनी महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाकडे गाळ काढण्याची मागणी केली आहे.

१५ ऑगस्ट पासून करंजा मच्छीमार बंदरातून मासळी खरेदी-विक्री सुरू झाली आहे. या नऊ महिन्यांच्या कालावधीत बंदरातून ३०० कोटीं पेक्षा अधिक मासळीची निर्यात झाली आहे. ही मासळी अमेरिका, चीन तसेच आशिया व युरोप खंडातील अनेक देशात निर्यात करण्यात आली आहे. तर दुसरीकडे मासळी बंदर आणि त्यावर आधारित विविध प्रकल्पांमुळे करंजा परिसरात विविध प्रकारच्या छोट्या-मोठ्या लघु उद्योगांत वाढ होत चालली आहे. त्यामुळे येथील



स्थानिक बेरोजगारांना बऱ्यापैकी रोजगारही उपलब्ध होऊ लागला आहे. त्यामुळे येथील मच्छीमारांना लाभ झाला आहे. त्याच बरोबरीने स्थानकांच्याही व्यवसायात भर पडली आहे.

राज्यातील सात सागरी जिल्ह्यांतील सर्वात मोठे मच्छीमार करंजा गाव म्हणून ओळखले जाते. राज्यातील सर्वाधिक सुमारे ६५० मच्छीमार बोटी याच करंजा गावात मासेमारी करतात. राज्यातील सर्वात मोठी मच्छीमार सहकारी संस्थांही करंजातच आहे. वार्षिक सुमारे १०० कोटींची उलाढाल असलेल्या या मच्छीमार संस्थेच्या माध्यमातून डिझेलमागे एक पैसा आणि बर्फाच्या विक्रीमागे एक रुपया विकास निधी वसुल करुन शाळा, हॉस्पिटलची उभारणी केली आहे. अशा सर्वाधिक मासेमारी करणाऱ्या करंजा मच्छीमारांच्या शेकडो बोटी मासळी उतरविणे, विक्रीसाठी मुंबईतील एकमेव ससुनडॉक बंदराच्या आश्रयाला जात होते. त्यामुळे ससुनडॉक बंदरावरील वाढता ताण लक्षात घेऊनच करंजा येथेच उपयुक्त जागेत सुमारे २०० कोटी खर्चाचे एक हजार मच्छीमार बोटी क्षमतेचे अद्यावत करंजा मच्छीमार बंदर उभारण्यात आले आहे. या बंदरात आमदार महेश बालदी यांच्याहस्ते १५ ऑगस्ट पासून मासळी बाजार सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे हे करंजा बंदर हजारो मच्छीमारांसाठी वरदान ठरले आहे. करंजा मच्छीमार बंदर परिसरात सध्या गाळ साचल्यामुळे तेथे ड्रेजिंग करण्याची अत्यंत तातडीची गरज निर्माण झाली आहे. साचलेल्या गाळामुळे बंदरात मासेमारी नौका सहजपणे ये-जा करू शकत नाहीत. विशेषतः भरती-ओहोटीच्या वेळी पाण्याची पातळी कमी असल्यामुळे बोटी अडकल्याची वा आपटल्याच्या घटना घडत आहेत. ही परिस्थिती मच्छीमार बांधवांच्या जीवितास व नौकांच्या सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण करणारी आहे. लवकरात लवकर ड्रेजिंग करण्यात आले नाही. तर बंदरात मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.

## सौर ऊर्जेचे कवच! पनवेल पालिकेच्या मालमत्तांवर एक हजार किलो वॅट वीज निर्मितीचे लक्ष्य

■ पनवेलः नितीन देवळेकर

पनवेल महापालिकेने सौर ऊर्जेची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आखले आहे. मागील अनेक महिन्यांपासून पालिकेतील विविध मालमत्तांवर सौर यंत्रणा बसवण्याचे काम सुरू आहे. या ऊर्जा निर्मितीमधून तब्बल एक हजार किलो वॅटची वीज निर्मितीसाठी विविध ठिकाणी पालिकेने कामे हाती घेतली आहेत. यासाठी पालिका स्वनिधी आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तब्बल १० कोटी रुपये खर्च करणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी प्रत्येक महापालिकांना जास्तीत जास्त सौर ऊर्जेची निर्मिती केंद्र बनण्याचे लक्ष्य दिले आहे. यामुळे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील पनवेल महापालिकेचे



आयुक्त मंगेश चितळे यांनी सुद्धा अनेक महिन्यांपासून महापालिकेच्या प्रत्येक मालमत्तांवर अपारंपरिक ऊर्जा निर्मितीची यंत्रणा बसविण्याचे आदेश पालिकेच्या वीज विभागाला दिले. सौर ऊर्जेचा सर्वाधिक वापर ज्याठिकाणी वीज जोडणीची समस्या किंवा वारंवार वीज पुरवठा खंडित होतो अशा ठिकाणी करावा असे आदेश आयुक्त चितळे यांनी दिले होते.

पालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर आणि वीज विभागाचे प्रमुख प्रीतम पाटील यांनी सौर ऊर्जा यंत्रणा बसविण्यासाठी अशा ठिकाणांची निवड केली. यामध्ये पनवेल महापालिका क्षेत्रातील ६० सार्वजनिक शौचालयांची निवड करण्यात आली. यातील अनेक शौचालये शीव-पनवेल महामार्गावर आहेत. तसेच ३७ विविध बसथांबे निवडण्यात आले. अनेकदा महामार्गावरील बसथांब्यापर्यंत वीज पुरवठा करणे शक्य होत नसल्याने सौर ऊर्जा हा उत्तम पर्याय प्रवाशांना मिळणार आहे. तब्बल ९७ ठिकाणी बसविण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा यंत्रातून २ किलो वॅट वीज निर्माण होईल.

महापालिका लवकरच खारघर येथील स्काय वॉकवर सौर ऊर्जेचे यंत्रणा बसविणार आहे. यासाठी ७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यामधून ६०० किलो वॅटची उर्जा निर्माण होईल. जिल्हा नियोजन समितीच्या मंजूरीनंतर हे काम हाती घेतले जाईल. तसेच महापालिकेच्या १० वेगवेगळ्या मालमत्तांवर पालिका सौर ऊर्जा यंत्र बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

## तिसऱ्या मुंबईच्या उभारणीसाठी दक्षिण कोरियाचा मदतीचा हात, स्मार्ट सिटी निर्मितीसाठी गुंतवणुकीची तयारी

■ मुंबई : राकेश गायकवाड

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) अटल सेतू प्रभावित क्षेत्र कर्नाळा – साई – चिरनेर नवनगर परिसरात तिसरी मुंबई वसविण्याच्यादृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. तिसऱ्या मुंबई, स्मार्ट सिटीच्या निर्मितीसाठी आता एमएमआरडीएला दक्षिण कोरियाची मदत मिळणार आहे. दक्षिण कोरियाने तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी गुंतवणुकीची तयारी दर्शविली आहे. दक्षिण कोरियाच्या सरकारमधील अधिकारी, उद्योजक, शहर नियोजन तज्ज्ञ आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने नुकतीच महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांची भेट घेतली. यावेळी तिसऱ्या मुंबईच्या उभारणीबाबत उभयतांमध्ये चर्चा झाली. त्यावेळी दक्षिण कोरियाने गुंतवणुकीची तयारी दर्शविल्याने आता तिसऱ्या



मुंबईच्या निर्मितीला वेग येणार आहे. एमएमआरडीए तिसऱ्या मुंबईची उभारणी करणार असून यात निवासी, अनिवासी संकुल, शाळा, रुग्णालय, रस्ते, हरित क्षेत्र यासह विविध सुविधांचा समावेश असणार आहे. तिसऱ्या मुंबईच्या उभारणीसाठी एमएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरणाचा दर्जाही देण्यात आला आहे. त्यानुसार आता लवकरच तिसऱ्या मुंबईच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. आता दक्षिण कोरियाने तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी एमएमआरडीएला मदतीचा हात दिला आहे. जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये इंडिया ग्लोबल फोरम २०२५ च्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या एका चर्चेत दक्षिण कोरियाचे शिष्टमंडळ सहभागी झाले होते. यावेळी तिसऱ्या मुंबईची निर्मिती आणि गुंतवणूक यावर चर्चा करण्यात आली. यावेळी शिष्टमंडळाने तिसऱ्या मुंबईसाठी गुंतवणूक करण्याची तयारी दर्शविल्याची माहिती एमएमआरडीएकडून देण्यात आली. दक्षिण कोरियाच्या शिष्टमंडळात इंचोऑन फ्री इकॉनॉमिक झोन अथॉरिटीचे (आयएफईझेड) संचालक सांग-हो ली, कोट्रा मुंबईचे (कोरिया ट्रेड-इन्व्हेस्टमेंट प्रमोशन) ब्योन्ग – इल वू साह आदींचा समावेश होता.

शिष्टमंडळ आणि मुखर्जी यांच्यात झालेल्या चर्चेनुसार दक्षिण कोरिया लॉजिस्टिक्स, ट्रान्झिट हब्स आणि इतर क्षेत्रांसाठी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आयएफईझेडचे गुंतवणूकदार नेटवर्क्स आणि कोट्राच्या प्रचार माध्यमांचा उपयोग करणार आहे.

## संक्षिप्त

### सोन्याच्या भावात सर्वात मोठी उसळी, एक लाखाचा टप्पा ओलांडला

■ मुंबई : सम्यक कासारे

अमेरिकेच्या नव्या टॅरिफ धोरणामुळ जगभरातील भांडवली बाजारांमध्ये प्रचंड मोठी उलथापालथ झाली आहे. तसेच चीन आणि अमेरिका यांच्याकडून एकमेकांवर जास्तीत जास्त कर लावण्याचा सपाटा सुरु आहे. या दोन महासत्तांमधील व्यापार युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्थिर वातावरण निर्माण झाल्याने गुंतवणुकीचा सर्वात सुरक्षित पर्याय असणाऱ्या सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. जागतिक बाजारात ऐतिहासिक पातळीवर सोन्याचा दर



गेल्यानंतर देशांतर्गत देखील सोन्याच्या भावाला झळाळी मिळाली आहे. सोमवारी वायदे बाजार उघडताच सोन्याच्या भावात मोठी उसळी पाहायला मिळाली. एक तोळा म्हणजे १० ग्रॅम सोन्याचा भाव सोमवारी सकाळी सोन्याचा दर आज प्रति तोळा १ लाख ११६ रुपयांवर पोहोचला. यामध्ये वस्तू व सेवा कराच्या रक्कमेचा समावेश केल्यास आता ग्राहकांना एक तोळा सोने खरेदी करण्यासाठी १ लाखांपेक्षा जास्त पैसे मोजावे लागणार आहेत. त्यामुळे आता सोने खरेदी ही सर्वसामान्यांच्या आवाक्यापलीकडे गेल्याचे दिसत आहे. जळगावच्या सुवर्ण नगरीत सोन्याचे दर लाखांच्या उंबरठ्यावर जाऊन पोहोचले आहे. अमेरिका आणि चायना यांच्यातील ट्रेड वॉरचा परिणाम म्हणून गुंतवणूक दार सोन्याची खरेदी मोठ्या प्रमाणात करत असल्याने सोन्याच्या मागणीत मोठी वाढ होऊन सोन्याचे दर आज ९६२०० तर जी एस टी सह हेच ९९२०० वर जाऊन पोहोचले आहेत.

### मोरबे धरणाचा जलसाठा निम्म्यावर; नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन

■ नवी मुंबई : प्रतिनिधी

नवी मुंबई - मुंबईसह राज्यभरात प्रचंड उष्माघातामुळे नागरिक हैराण झालेले असून पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांचा जलसाठाही कमी होऊ लागला आहे. स्वतःच्या मालकीचे धरण असलेल्या व जलसंपन्न शहर संबोधल्या जाणाऱ्या नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातील जलसाठाही यंदाच्या उन्हाळ्यात प्रथमच ५० टक्क्यांच्या खाली आला आहे. सध्या धरणात ४९.३७ टक्के पाणी आहे. मात्र इतर शहरांच्या तुलनेत नवी मुंबईची स्थिती चांगली असून या साठ्यातून



आणखी १३३ दिवस शहराला सुरळीत पाणीपुरवठा होऊ शकतो. मुंबई व राज्यातील विविध भागांना जुलै महिन्यापर्यंत पाणीपुरवठ्याचे आव्हान पेलावे लागणार असताना नवी मुंबईत मात्र मोरबे धरणात सध्या मागील दोन वर्षांपेक्षा अधिक जलसाठा शिल्लक आहे. परंतु तरीही नागरीकांनी पाण्याचा वापर जपूनच करावा असे आवाहन करण्यात आले आहे. मोरबे धरण परिसर व नवी मुंबई शहरात मागील वर्षी पावसाळ्यात चांगला पाऊस झाला होता. मोरबे धरण २८ ऑगस्ट २०२४ ला १०० टक्के भरले होते.